

दरेनि

डॉ. सुहास पेठे

दर्शन

(सद्य:स्थितीचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या आणि
शाश्वताचे दिग्दर्शन करणाऱ्या नव्या प्रतिभाशाली बोधकथा)

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* दर्शन

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : मार्च २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

येथील कथांत शब्दबद्ध होऊ शकलेले
व शब्दबद्ध होऊ न शकलेलेही
वाचणाऱ्या, समजून घेणाऱ्या
सहृदय
वाचकांना ....

... प्रेमादराने अर्पण

- सुहास पेठे

कथादर्शनापूर्वी

आजवरच्या असंख्य थोर बोधकथाकारांना आदराने वंदन करून या आजच्या युगाच्या, स्वानुभवाच्या व स्वचिंतनाच्या बोधकथांची सेवा सादर करीत आहे. त्यात जे काही थेट, औपरोधिक, सूचक इ. आहे ते चिंतनाने वाचकांना स्पष्ट होवो ही सदिच्छा.

जे शब्दांत मांडता येते त्यापेक्षा काही वेळा जे शब्दांत मांडता येत नाही, ते जास्त असते. हा अनुभव बोधकथांत अनेकदा येतो, कारण परिस्थितीचे-सत्याचे दर्शन एवढे व्यापक, विदारक, स्तिमित करणारे असते की, त्याचे सर्व पैलू शब्दांत व्यक्त करणे शक्य नसते. तीच गोष्ट कथेच्या तात्पर्याची आहे. त्यामुळे येथेही एखादे सूचक व औपरोधिक तात्पर्य देऊन उरलेले वाचकांवर सोडलेले आहे.

जीवन ही वस्तू एकसंध व सलग आहे. त्यामुळे ती व्यक्त करताना येथे जीवनाच्या अनेक अंगांचे दर्शन घडत कथांचे विषय विविध झाले आहेत. पण त्यांत वास्तवाच्या पाऊलखुणा, कल्पनेची किनार, बोधाची तळमळ व अलौकिकाचा स्पर्श समान आहे.

या मुखपृष्ठावरील चौकट निश्चित अनुभव दर्शवते. उंच झेपावणारे झाड जमिनीचे व निसर्गाचे प्रतिनिधित्व करते. इंद्रधनुष्य सत्य व कल्पनेचे सुंदर मिश्रण दाखवते. तर मागील धूसर आकाश ईश्वराचे सूचन करते. मलपृष्ठावरील रिकामी चौकट कथांतून होणारे आत्मपरीक्षण व स्वत:चे अनुभव यांसाठी मोकळेपण देत आहे. या मुखपृष्ठासाठी श्री. नंदन व त्याला साहाय्यभूत झालेले श्री.शैलेश मंत्री यांचा मी ऋणी आहे. मुद्रणासाठी श्री. संदेश शहा यांचा मी आभारी आहे.

पुस्तक जास्त ठिकाणी जावे म्हणून मूल्य कमी ठेवणे, हे आमचे श्रींच्या आज्ञेनुसार केलेले कौटुंबिक ज्ञानदान होय. सेवा म्हणून पुस्तकवितरण करणारे श्री. फुले तसेच असेच काम स्वयंस्फूर्तीने करणारे असंख्य वाचक यांचा मी ऋणी आहे.

हे कथादर्शन वाचकांना अंतर्मुख, चिंतनशील व कृतिप्रवण करो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

- सुहास पेठे

* दर्शन *

- अनुक्रम -

१. दुबळा जीव !	७
२. पाणी	१०
३. शांती	१२
४. दशमान पद्धती	१३
५. राग	१४
६. स्वामित्व	१६
७. दुर्दैवी माता	१७
८. वस्तूचा उपयोग	२३
९. उपदेश	२५
१०. भक्तरक्षण	२७
११. मोठे घर	२९
१२. प्रगतीसाठी चळवळ	३१
१३. अंतिम हित	३३
१४. महाकुशल नोकर	३६
१५. कृपा	३९
१६. खरे उत्तर	४१
१७. वास्तववादी दृष्टिकोन	४३
१८. जबाबदारी	४५
१९. उद्दिष्टपूर्ती	४६
२०. देवळातला देव	४८
२१. कायदेशिक्षण	५०

२२. सैन्यातली नोकरी ५१
२३. उद्योगशीलता ! ५३
२४. साधूंचे मोठेपण ५५
२५. अकृतज्ञ लोक ५६
२६. थोडी हुशारी ५७
२७. अखेरची करुणा ५८
२८. आजचे चमत्कार ६१
२९. संकटातून सुटका ६२
३०. कलियुगातले कल्याण ६३
३१. लोक ६५
३२. न कळणारी गुलामगिरी ६६
३३. प्रवचनविद्येची प्रगती ६७
३४. खरे समाधान ७०
३५. अपारंपरिक उद्योग ७१
३६. सुखी माणूस ७२
३७. उत्पन्नाचे उपाय ७३
३८. घातक जंतू ७५
३९. आजची वांगी ७८
४०. पुण्याई ८०
४१. प्रवेशपात्रता ८१
४२. नवी नीती ८२
४३. देवाची युक्ती ८३
४४. पुनर्वसन ८५
४५. दर्शन ८९

१. दुबळा जीव !

ईश्वराने माणसाची निर्मिती केली आणि तो कृतकृत्य झाला. आजूबाजूच्या देवांना मात्र वाटले की, याच्यापेक्षा आधीचे जीव किती सशक्त होते. रक्षण-भक्षण-पोषण अशा साध्यासाध्या बाबीतसुद्धा हा माणूस दुबळा आहे. आधीचे जीव बऱ्याच बाबतीत याच्यापेक्षा श्रेष्ठ होते. ते स्वतःचे रक्षण करू शकत. कुणाला तीक्ष्ण दात, कुणाला सामर्थ्यवान पंजे-हात-नखे, कुणाला सोंड-शिंगे अशा असंख्य देणग्या त्याने रक्षणासाठी दिल्या होत्या.

म्हणून 'आम्हाला माणूस हा जीव फार दुबळा वाटतो आहे' असे देव ईश्वराला म्हणाले. ईश्वर उत्तरला, 'शांत रहा. त्याला जे जे दिले आहे ते आत आहे. त्याने तो स्वतःचे रक्षण करील.'

देवांनी पृथ्वीवर पाहिले. माणसाने बुद्धीचा वापर करून तोपर्यंत शस्त्रे हुडकली होती. त्या शस्त्रांनी तो स्वतःचे रक्षण तर करीत होताच, पण उलट इतर सशक्त प्राण्यांनासुद्धा स्वतःच्या ताब्यात ठेवू लागला होता! देवांना आश्चर्य वाटले. पण ते ईश्वराला म्हणाले, 'हा भक्षण काय करील, हा इतरांसारखे प्राणी खाऊ शकणार नाही, पचवू शकणार नाही. याचे पोषण होणार नाही, हा टिकणार नाही.' ईश्वराने तेच उत्तर दिले, 'शांत रहा. त्याला जे जे दिले आहे ते आत आहे. त्याने तो मार्ग शोधील.'

देवांनी पाहिले. तोवर माणसाने शेतीचा शोध लावला. एक दाणा टाकून तो शंभर दाणे पिकवू लागला. धान्य-फळफळावळ यांवर तो उत्तम जगू लागला होता! देव चकित झाले. त्यांनी ईश्वराला विचारले, 'हे ठीक आहे. तरीही हा दुबळा वाटतो. हा स्वतःचा विकास

कसा करील ?' ईश्वराने तेच उत्तर दिले,'शांत रहा. त्याला जे जे दिले आहे ते आत आहे. त्याने तो स्वतःचा विकास करील.'

देवांनी माणसाकडे पुन्हा पाहिले. तोवर माणसाने शास्त्रे शोधली. भाषा शोधल्या. संस्कृती उभ्या राहिल्या होत्या. कलांचा विकास होत होता. सुधारणा होत होत्या. सुखसुविधा झाल्याने पृथ्वीवर त्याने स्वर्गाइतका विकास केला! देवांना आश्चर्य वाटले. तरी त्यांनी ईश्वराला विचारले,'हे सर्व याने केले. हा आधीच्या जीवांपेक्षा श्रेष्ठ आहे खरा, पण हा स्वतःचा उद्धार कसा करील ?' ईश्वर म्हणाला,'थांबा, तेही त्याला दिले आहे. ते बाहेर नाही. शांत राहून पहा.'

देवांनी पाहिले. माणसाने सूक्ष्म चिंतन करून सृष्टीच्या निर्मात्याचा शोध घेतला होता. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार त्याला झाला होता. अशी अनेक माणसे जीवन्मुक्त होऊन जात होती! देव आता मात्र थक्क झाले. त्यांनी शेवटची शंका विचारली,'माणूस आता सर्वच करू शकतो आहे, हे खरेच. पण आता आमच्यासारखाच तो अजरामर होईल का की त्याचा विनाश होऊ शकेल?'ईश्वर म्हणाला, 'तेही पहा.'

देवांनी पाहिले. माणसाने तोवर सर्व प्रकारची प्रगती साधली होती. तो त्या प्रगतीचे सिंहावलोकन करीत होता. तिची व्याप्ती पाहून त्याचे स्वतःचेही डोळे दिपले.

त्याला वाटले, आपल्याला जगात तोड नाही! नाहीतरी देव म्हणजे काय असते! आपण एवढे कर्तृत्व केले म्हणजे आपण देवाच्या, ईश्वराच्याहीपेक्षा मोठे आहोत. त्या क्षणापासून त्याच्यात अहंकार निर्माण झाला. त्या बीजापासून अनेक विनाशकारी गोष्टी निर्माण झाल्या. त्या अहंकाराने कित्येक माणसांच्या ठिकऱ्याठिकऱ्या उडवल्या !

देव ईश्वराकडे थक्क होऊन पाहात राहिले. त्यांनी ईश्वराला पुढे काहीही विचारले नाही !

***

तात्पर्य :

१. माणसाच्या अंतर्जीवनावर त्याचे सारे अवलंबून आहे - विकासही, विनाशही !

२.

२. पाणी

एकदा जगात पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई झाली. त्यावरून भांडणे सुरू झाली. तेव्हा एका हुशार देशाने ते पाणी दोन वायूंच्या मिश्रणाने बनते हे शोधले. तसेच वायूंच्या मिश्रणापासून पाणी बनवण्याचे तंत्रज्ञान शोधून काढले.

शिवाय मग असे वायूंच्या मिश्रणापासून बनलेले पाणी फारच आरोग्यकारक असते असे त्या देशाने जगभर प्रसृत केले ! नंतर या दोन वायूंच्या निर्मितीचे व मिश्रणतंत्रज्ञानाचे महाकारखाने त्या हुशार देशाने लगेच काढले !

इतर देशांना पिण्याच्या पाण्याचा यक्षप्रश्न भेडसावतच होता. अशा देशांना या हुशार देशाने त्यांच्या गरजेप्रमाणे प्रचंड किमतीस ते वायू व मिश्रणतंत्रज्ञान विकत देण्यास सुरुवात केली. इतर देशांना अन्य पर्याय नसल्याने त्यांनी मिळेल त्या किमतीस हे मिश्रणाचे पाणी विकत घेऊन आपापल्या देशाचा पाण्याचा प्रश्न सोडवला.

पुढे या हुशार देशाने इतर देशांनी त्यांच्याकडे असलेले थोडे खरे पाणी या देशास दिल्यास त्यांना या मिश्रणपाण्याच्या किमतीत आकर्षक सूटही देऊ केली ! काही देशांतल्या सत्तारूढ सरकारांनीही 'मोठ्या हुशारीने' ती सूट मिळवून 'मिश्रणबिल कमी आणलेले दाखवून' आपापल्या देशवासीयांची शाबासकीही मिळवली! या मिश्रणपाणी आयातीत अनेक देश कंगालही झाले.

त्या हुशार देशातल्या लोकांना बाहेरून खरे पाणी मिळू लागले. त्या हुशार देशातील लोकांनी अशा मूळ नैसर्गिक पाण्याचा मुबलक साठा केला. त्याचा वापर करून ते 'खरे आरोग्यसंपन्न' जीवन जगू

लागले. शिवाय त्यांना या वायू व मिश्रणतंत्रज्ञानाच्या विक्रीतून साऱ्या जगातली संपत्तीही हुशारीचे बक्षीस म्हणून वर मोठ्या प्रमाणात मिळू लागली.

इतर देशांची मात्र या तांत्रिक पाण्यातून व त्यावरच्या अवास्तव खर्चातून कधी सुटका झाली नाही !

***

तात्पर्य :

१. दुसऱ्यांची हुशारी ओळखण्याइतपतसुद्धा आपण हुशार नसू तर अखेर कुणाच्या तरी हुशारीचेच पाणी आपल्याला प्यावे लागणार !

२. पाण्यासारख्या अनेक वस्तू जगामध्ये हुशार देशांच्या हातांमध्ये आहेत हे लक्षात ठेवून जगावे.

३.

३. शांती

एक माणूस अंतर्यामी खूप शांत असे. त्याला शांततेचे महत्त्व वाटे. तो ते लोकांना सांगे. त्याला वाटे सर्वांनी अशी शांती मिळवावी. पण त्याचे ऐकायला कोणी थांबत नसे.

मग त्याने शांतीसाठी एक यज्ञ करायचे ठरवले. त्याबरोबर शंभरेक लोक त्याच्याजवळ गोळा झाले. यज्ञ नियोजनपूर्वक व थाटात पार पडला. मग त्याला वाटले लोकांना शांतीचे महत्त्व पटत चालले.

म्हणून नंतर त्याने एक मिरवणूक काढायची ठरवली. त्या 'शांतियात्रे'ला हजार लोक गोळा झाले. तो माणूस अधिकच खूष झाला.

आता त्याने शांतीसाठी 'राज्यव्यापी आंदोलन' करायचे ठरवले. त्याला तर लाखो लोकांचा प्रतिसाद मिळाला. आंदोलनाने राज्यभर शांतीचा उद्‌घोष झाला ! लाखो लोक 'शांतीच्या पुढील कार्यक्रमासाठी' आता त्याच्याकडे आशेने पाहू लागले !

त्या रात्रीपासून तो मात्र स्वतःच्या अंतर्यामीची शांती गमावून बसला !

***

तात्पर्य :

१. लोकांची शांती कार्यक्रमांवर अवलंबून असते.

२. शांत राहाण्यापेक्षा शांतीसाठी कार्य करण्यात अनेकांना शांती मिळाल्यासारखे वाटते !

३.

४. दशमान पद्धती

पूर्वी मागासलेल्या राज्यांतल्या लोकांना मासिक पगार मिळे. तर इतर पुढारलेल्या राज्यांतल्या लोकांना वार्षिक पगार मिळत असे. अशाच एका पुढारलेल्या राज्यात दोन मित्र होते. पहिल्याला वर्षाला पाच लाख पगार मिळे. दुसरा मित्र संधी मिळून परदेशात गेला होता. तो पुढे सुट्टीवर गावी आला. दोघा मित्रांची भेट झाली. पहिल्याने दुसऱ्याला परदेशातले काम, पगार वगैरे विचारले. त्याने बोलताबोलता चाळीस लाख पगार असल्याचे सांगितले.

पहिला गप्पांनंतर रात्री घरी आला. त्याला फार खिन्नता आली. त्याला झोप लागेना. शेवटी परत उठून रात्रीच पुन्हा तो त्या परदेशी मित्राकडे गेला. त्याला विचारले,'आपले शिक्षण व काम तसे सारखे असूनसुद्धा तुला एवढा पगार कसा?' मित्र म्हणाला,'अरे त्या देशात दशमान पद्धती आहे. मी सांगितला तो पगार दहा वर्षांचा आहे!'

पहिला आनंदाने घरी परतला. आता तो शांतपणे झोपी गेला!

***

तात्पर्य :

१. विविध पद्धतींचे ज्ञान कमीजास्त असल्यास आपल्यासही सुखदुःख कमीजास्त होते.

२. पद्धती कोणत्याही असल्या तरी अजून तरी गरजेच्या वेळेला व साधारणतः दर महिन्यालाच पैसे खर्च करावे लागतात.

३.

५. राग

एका राज्यात 'एके काळी' राग येण्याला लोक फार दुर्गुण समजत. 'शासकीय कायद्या'तही राग 'दुर्गुणा'त समाविष्ट होता. 'त्यामुळे' रागीट माणसालाही फार अपराधी वाटे.

पुढे राज्याची लोकसंख्या खूप वाढली. राज्याची इतर प्रगतीही झाली. पण त्यामुळे राज्यात बऱ्याच प्रकारच्या टंचाई व दुर्भिक्ष्ये निर्माण झाली. त्यांत सर्वांत मोठे संकट विजेच्या टंचाईचे होते. त्यावर अनेक उपाय केले जात.

एकदा एका शास्त्रज्ञाने असा शोध लावला की, रागीट माणसाच्या रागात ऊर्जा असते. तिचा वीजनिर्मितीसाठी उपयोग करता येऊ शकेल.

ही बातमी हळूहळू पसरली. टंचाईवरचा उपाय म्हणून सरकारने काही रागीट माणसांना हाताशी धरून ऊर्जानिर्मितीचे प्रयोग सुरू केले.ते यशस्वी होत गेले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर या प्रकारची ऊर्जा निर्माण करावी असा निर्णयही घेण्यात आला. अशा रागीट माणसांकडून घ्यावयाच्या सेवेसाठी त्यांना द्यायच्या मानधनाची तरतूदही अंदाजपत्रकात करण्यात आली.

यात रागीट माणसांचा भाव वाढला. त्यांना यथोचित 'स्वामित्वधन'ही मिळू लागले. त्यामुळे राग न दाखवणारे लोकही मोकळेपणाने रागावू लागले! तेव्हा अखेर असे कळले की, राज्यातले जवळपास सर्वच लोक रागीट होते. मात्र यामुळे ते सर्व 'दुर्गुणी' ठरत असल्याने राज्याच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेस हानी पोचण्याचा धोका निर्माण झाला !

म्हणून शासनाने कायद्यात बदल करून राग हा सद्‌गुणात समाविष्ट केला व रागापासून ऊर्जानिर्मितीचा शोध लावणाऱ्या संबंधित शास्त्रज्ञाची आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस केली !

***

तात्पर्य :

१. फायदा होत असल्यास माणूस प्रामाणिकपणे वागू शकतो !

२. 'तांत्रिक' अडचणी दूर करता येतात !

३.

६. स्वामित्व

एक ब्रह्मकमळाची वेल होती. संध्याकाळ होताच त्या वेलीवर एक कमळ येऊ लागले. ते मोठे होऊ लागताक्षणीच वेलीच्या लक्षात आले की, ते फार विलक्षण, अप्रतिम होत आहे. हे आपल्या ताब्यात राहिले तर बरे होईल. न राहिले तर कुणी त्याचा सुगंध घेतील, कुणी त्याची छायाचित्रे काढतील, कदाचित तोडतील, कुणाला तरी देतील- त्यावर अनेक लोक भल्याबुऱ्या मार्गाने पैसे मिळवतील !

म्हणून त्या वेलीने त्या कमळाच्या 'स्वामित्वा'साठी नेटवर त्वरित अर्ज केला. त्यावर स्वामित्वाच्या जागतिक कार्यालयाकडून त्वरित उत्तर आले की, फुले, संत, आकाश अशा काही गोष्टी या स्वामित्वाच्या कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात आल्या आहेत ! त्यामुळे आपल्या अर्जाचा विचार करता येत नाही.

तोवर रात्र होऊन कमळ पूर्ण फुलले होते. त्या वेळात त्याने जवळच्या-दूरच्या असंख्य लोकांना सुगंध व अपार आनंदही दिला होता. अखेर ते पूर्ण वाढल्यावर रातोरात कुणीतरी मंदिरात नेऊन ते देवाला अर्पणही केले होते.

वेल मात्र स्वामित्वाचा दुखरा देठ सांभाळीत हळूहळू निराशेने कोमेजू लागली होती.

***

तात्पर्य :

१. स्वामित्वाचे व सुरक्षिततेचे प्रयत्न दुःख देतात, तर निरपेक्ष निर्मिती आनंद देते !

२.

७. दुर्दैवी माता

महाराष्ट्र नावाच्या एका प्राचीन, प्रगत, वैभवसंपन्न प्रांतातल्या एका मोठ्या शहरातली ही गोष्ट आहे. खेड्यापाड्यांपासून महानगरांपर्यंत या राज्यातील सर्व लेकरे त्यांच्या 'मराठी' नावाच्या समर्थ मातृभाषेच्या दुधावर वाढली होती. शतकानुशतके, पिढ्यानपिढ्या हे सारे लोक मराठी मातेच्या अंगाखांद्यावर खेळत होते. त्यांना आई म्हणून तिचा सार्थ अभिमानही होता. कित्येक शतकांपूर्वी याच भाग्यशाली राज्यात जन्मलेल्या, साक्षात भगवंताचा अवतार असलेल्या महान संतांनी मुद्दाम, मोठ्या कौतुकाने सर्वसामान्यांना कळावे, म्हणून एका अलौकिक ग्रंथाची रचनाही याच 'माय मराठी'त निर्धाराने केली होती. त्यांना त्या काळच्या संस्कृतसारख्या इतर भाषांची उत्तम जाण, आदर असूनही आपल्या मातृभाषेचा यथार्थ अभिमान होता. त्यासाठी स्वतःच्या आयुष्यातली अजरामर कृतीही याच 'मराठी'त लिहिण्याचे आणि ती भाषा समृद्ध करून तिचे ऋण जपण्याचे धैर्यही होते.

अशा या राज्यातल्या माणसाचे मातृभाषेवर प्रेम होते, तिचा त्यांना अभिमान होता. आपली भाषा समृद्ध व्हावी, आपले जीवन समृद्ध व्हावे म्हणून हे लोक जवळच्या - दूरच्या प्रांतांतल्या मराठीच्या इतर भाषाबहिर्णींचाही अभ्यास करीत, व्यासंग करीत. पण मातृभाषेतच शिक्षण घेत, लेखन करीत, व्यवहार करीत.

पण दुर्दैवाने, गाफील राहिल्याने हा महाराष्ट्र प्रांत ज्या देशात होता, त्या साऱ्याच देशावर पारतंत्र्याचे सावट आले. परकीयांनी हळूहळू राजकीय सत्ता हस्तगत केली. क्रमाक्रमाने स्वतःची जीवनपद्धत आणली, संस्कृती आणली. परकीय हे सत्ताधारी असल्याने, त्यांची भाषा त्यांच्या

व्यवहाराला गरजेची असली, तरी या साऱ्या देशवासीयांना तीच आदर्श व श्रेष्ठ वाटू लागली.

कायदेकानू, शास्त्रे, विज्ञान सारे त्या भाषेतून येऊ लागल्याने, या परकीयांच्या इंग्रजी भाषेला सामान्य माणसाच्या दृष्टीने पार देवत्व आले. तीही एक भाषा-भगिनी असली, तरी तिच्याशिवाय आपले नडेल, असे वाटू लागले. इंग्रजी बोलणे, शब्द वापरणे हळूहळू इतके प्रतिष्ठेचे वाटायला लागले की, आपापल्या मातृभाषा श्रेष्ठ व जवळच्या असूनही, त्यात काही तरी कमतरता, मागासलेपणा आहे, असा समज झाला. सामान्य माणसाला आपल्या भाषेबद्दल न्यूनगंड निर्माण झाला.जे इतर प्रांतांचे झाले, तेच महाराष्ट्र या प्रगत प्रांताचेसुद्धा झाले.

या प्रांतातले लोक मराठी बोलण्यालिहिण्याला सामान्य, गावंढळ समजू लागले. पदोपदी इंग्रजी शब्द वापरून आपली प्रतिष्ठा वाढवायचा, ते नकळत प्रयत्न करू लागले. ही दूरची मावशी त्यांना इतकी आवडू लागली की, घराघरात, शाळेत, चौकात, किराणा दुकानात, उपाहारगृहात, कापडदुकानात, बाजारात, कार्यालयात सर्वत्र तिचा वापर करणे, त्यांना प्रतिष्ठेचे वाटू लागले.

पुढच्या पिढ्या तर याच भाषेत वाढू लागल्या, वाढवल्या जाऊ लागल्या. अगणित लोकांच्या त्यागावर या परकीयांचा बीमोड होऊन ते निघून गेले, पण आपल्याला पारतंत्र्यात ढकलणाऱ्या लोकांची भाषा मात्र या देशाने नकळत, कौतुकाने व बेसावधपणाने जी डोक्यावर धरली-ती तशीच राहिली. लोकांच्या मनावरचा तिचा प्रतिष्ठेचा आणि अपरिहार्यतेचा पगडा आणि पकड बेसावधपणामुळे कायम राहिली. परकीयांचे राजकीय दास्य संपले, पण त्यांच्या भाषेचे दास्य मात्र काळाबरोबर अधिकच पक्के होत चालले...

अशा एकदोन पिढ्या गेल्या. या महाराष्ट्रातल्या एका मोठ्या शहरात एक कुटुंब राहात होते. आईवडील अन् मुलगा. एके सकाळी हा एकुलता एक मुलगा 'होमवर्क' संपवण्याच्या गडबडीत होता. सकाळी त्याला 'जिम'वरून आणणारी 'रिक्शा' 'लेट' झाली होती. त्याला होमवर्कला फक्त अर्धा तास राहिला होता. आता त्याचा फक्त एक 'एसे' लिहायचा होता. त्याला तो लिहिता येत नसल्याने, 'किचन'मधल्या 'मम्मी'ला तो विचारायला गेला.

एसेचे नाव होते 'मदरटंग'. त्याला काहीच माहीत नसल्याने मम्मीच्या मागे त्याची पिरपीर सुरू झाली. शेवटी तिने लक्ष घातले. तिला ते कळल्यावर ती म्हणाली, 'कम ऑन बेटा, इट इज व्हेरी सिंपल. युअर मदरटंग इज मराठी. सो फर्स्ट राइट द टायटल ऑफ् द एसे - 'मातृभाषा'!'

मुलाने खूप प्रयत्न केला. त्याला अक्षरे नीट जमेनात. तरी कष्टाने त्याने लिहिले 'मातरूबाशा'. ते पाहाताच मम्मी ओरडली, 'हाऊ मेनी मिस्टेक्स इन रायटिंग द टायटल इटसेल्फ. राइट - मातृभाषा!' त्याला ते जमत नसल्याने तिने स्वतःच ते त्याला लिहून दाखवायचे ठरवले. त्याने लिहिलेले चुकते आहे, हे तिच्या लक्षात आले होते. म्हणून तिने सुधारणा करून टायटल लिहिले 'मात्रुबाशा'. 'बट शी वॉज नॉट दॅट सॅटिस्फाइड'!, म्हणून तिने मुलाच्या पप्पांना हाक दिली. 'सो दॅट शी कुड गेट हेल्प!'

पप्पा बाहेर लॅपटॉपवर कामात मग्न होते. मुलगा डॅडकडे गेला. त्यांनी थोडे लक्ष घालून, शत्रूतला 'त्र' घालून टायटल रेक्टिफाय केले- मात्रूभाषा. पण त्यांच्या 'प्रॉब्लेम' लक्षात आला होता. म्हणून त्यांनी पत्नीला हाक मारून म्हटले, 'कम ऑन डिअर, आय ॲम् सो बिझी, यू

नो. आय् हॅव लॉस्ट टच विथ इट! व्हाय वोंच यू प्लीज गाईड हिम?'

मम्मीने विचार करून म्हटले, 'ओके! आयडिया! लेटस आस्क युवर ग्रॅन्डपा.' मुलाचे आजोबा घरी त्यांचा 'डिस्टर्बन्स' वाटत असल्याने 'हॅपी ओल्डेज' नावाच्या वृद्धांच्या एका सोसायटीत राहात. पण तिथे रोज फक्त रात्री एकदा फोन करता येई. ते लक्षात आल्यावर, मम्मीने कल्पना लढवली,'दॅट वर्ड मातृभाषा इज द प्रॉब्लेम. व्हाय नॉट राइट आईची भाषा?'

मुलाने निबंधाचे नाव 'आईची भाषा' असे लिहिले. पण त्याच्यावर विचार करताना शतकानुशतके, ज्ञानेश्वर, उपजत, संवाद - असे अनेक शब्द यायला लागले. प्रत्येक शब्दावर अडू लागले. इकडे अर्धा तास संपत आला. मुलाची 'स्कूलबस' यायची वेळ झाली. मुलाला शाळेत पाठवून मम्मीने, मीच ऑफिसला जाताना तुमच्या 'मिस'ची भेट घ्यायला येते, म्हणून वेळ निभावली. मुलगा निबंध न लिहिताच शाळेत गेला.

जाताना आई मिसना भेटली. त्यांना सर्व अडचण आईने 'इंग्रजीत' समजावून दिली,'त्यामुळे' त्यांना ती लगेच कळली! त्यांना इंग्लिश मिडियमचा खूप 'एक्स्पीरिअन्स' असल्याने, त्यांनी लगेच एक 'सोल्यूशन' या मम्मीला 'ऑफर' केले. त्या म्हणाल्या,'व्हाय वोंच यू राइट मदरटंग अॅज इंग्लिश? यू आर हिज 'मदर'. यू हॅव ऑल्सो बीन टॉट इन 'इंग्लिश' सिन्स युअर चाइल्डहुड! सो हिज 'मदर''टंग' इज इंग्लिश इटसेल्फ, यू नो!'

मम्मीला हा मार्ग खूपच 'सिंपल व वंडरफुल'वाटला. मुलाच्या रजिस्ट्रेशन फॉर्ममधली मुलाची मदरटंग तिने मराठी 'स्क्रॅच' करून इंग्लिश केली आणि मुलाला पटकन बाजूला घेऊन इंग्लिशवर एक एसे

डिक्टेट केला. प्रश्न सुटला आणि ती ऑफिसला गेली...

इकडे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक महानगरात आपल्याला आता कुठेच स्थान नाही, याने निराश होऊन एक वृद्ध, पण तेजस्वी माता लोकांना त्या संध्याकाळी खेडोपाड्यात फिरताना दिसू लागली. तिच्या अंगावर जीर्ण व फाटकी वस्त्रे होती. ती गरीब दिसत होती. प्रत्येक गावी ती मराठी माध्यमाच्या शाळा आणि मराठी बोलणारी माणसे हुडकून निराश होई. ती हळूहळू खेड्यापाड्यातच जास्त हिंडू लागली. तिथे पारावर, उघड्या छपराखाली मराठी मुळाक्षरे गिरवणारी मुले पाहून ती विसावा घेई !

जवळपासच्या शहरातून आलेले काही पालकही तिला तिथे भेटत. आपली मुले त्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत घालायची असत. त्यासाठी शाळा हुडकत ते तिथे आलेले पाहून, तिला एकीकडे आनंद तर एकीकडे दुःख होई. त्यांची वणवण तिला अस्वस्थ करी. पायात चपला नसताना, गळ्यात टाय अडकवून चालत निघालेली खेडोपाडीची मुले पाहिली की, तिच्या हृदयात कालवाकालव होई. इंग्रजीबरोबर इंग्रजी संस्कृतीला भुललेली तिची कित्येक लहानथोर लेकरेही तिला जागोजाग भेटत.

या वृद्ध मातेला एकीकडे तिच्याच एका परकीय बहिणीला मिळणारे स्थान, मान याचे कौतुक वाटे, पण आपल्या स्वतःच्याच घरी तिला राहायला घर, शाळा, कार्यालय, माणसे मिळणे कठीण होत होते. याचे तिला राहूनराहून दुःख होत असे...

आजही आईची आठवण करणाऱ्या कुणाही मराठी लेकराला ती दुर्दैवी माता भ्रमंती करताना दिसू शकते. त्या मातेच्या पाठीवर फाटक्या कपड्यांचे एक गाठोडे कायम असते. त्या फाटक्या गाठोड्यातून

'ज्ञानेश्वरी, गाथा' यांसारखे आतले जागतिक कीर्तीचे अनमोल ग्रंथ डोकावताना दिसतात. तिची कृतज्ञतेने जपणूक करणारे कुणी भेटले की, तिच्या चेहऱ्यावर आशेचे किरण चमकतात.

इतर भगिनींच्या लेकरांसारखी आपली लेकरेही आपला स्वाभिमानाने वापर करतील का, निदान तिच्या जिवावर उपजीविका करणारे तरी त्यांच्या मुलांना मराठीतून शिकवतील का, ती समृद्ध व्हावी म्हणून तिची बुद्धिमान, प्रतिभावान लेकरे कष्ट करतील का, अशांना बाकीची लेकरे मदत करतील का, ती सारी लेकरे आपल्याला वैभवाच्या नव्या शिखरावर नेतील का - असे अनेक प्रश्न, अनेक भाव या दुर्दैवी मातेच्या डोळ्यांत आजही दिसतात, आईची आठवण ठेवणाऱ्या कुणाही लेकराला ...!

***

तात्पर्य :

१. आईवर प्रेम करणे म्हणजे मावशीचा द्वेष करणे नव्हे !

२. मावशीचा आदर करणे म्हणजे आईची घोर उपेक्षा करणेही नव्हे !

३. मावशीचे प्रेम म्हणजे तिचे व तिच्या संस्कृतीचे दास्यत्व नव्हे !

४.

८. वस्तूचा उपयोग

एका गरीब शेतकऱ्याने आपल्या शेतात एका प्रकारच्या मधुर फळांची लागवड केली. ती फळे घेऊन तो बाजारात बसू लागला. पण ते फळ कुणास विशेष माहीत नसल्याने त्याची विक्री होईना. त्याला तोटा होऊ लागला.

पुढे त्याची एका व्यवसायव्यवस्थापनातल्या तज्ज्ञाची भेट झाली. या अडचणीवर उपाय सांगण्याचे त्याने मान्य केले. पण त्यासाठी 'बराच अभ्यास' व 'व्यावसायिक कौशल्य' लागणार असल्याने त्या तज्ज्ञाने सल्ल्यासाठी प्रचंड फी सांगितली. शेवटचा उपाय म्हणून शेतकऱ्याने ती हप्त्याने देण्याचे कबूल केले. तज्ज्ञाने अभ्यास करून त्याला व्यावसायिक सल्ला' दिला.

त्या 'सल्ल्या'नुसार त्या शेतकऱ्याने आता त्या फळाचे तीन भाग केले. सर्व साली एकत्र करून वाळवल्या त्याचे चूर्ण करून ते 'असाध्य' रोगावर एक पुरातन उपाय म्हणून तो विकू लागला.

दुसरा भाग गराचा होता. स्वादिष्ट व किंचित उत्तेजक पण मान्यताप्राप्त पेयनिर्मितीसाठी त्या गराचा तो वापर करू लागला.

फळाचा तिसरा भाग बियांचा होता. बी उगाळून लावल्यास सौंदर्यवर्धक ठरते म्हणून तो ती विकू लागला. त्याने त्या तीनही उत्पादनांची व्यावसायिक जाहिरातही केली.

तीनही उत्पादने आता उत्तम खपू लागली. नुसत्या सालीच्या विक्रीतून केवळ तीन महिन्यांतच त्याने त्या व्यवस्थापनतज्ज्ञाची प्रचंड फीसुद्धा 'एकरकमी' अदा केली. दहा वर्षांत त्याच फळावर या व्यापाराने तो लक्षाधीश झाला.

विशेष म्हणजे इतर राज्यांत असलेल्या व्यवसायव्यवस्थापन, कृषिविज्ञान व पेयविज्ञान या तीनही विद्यापीठांत त्याला मानद व्याख्याता म्हणून बोलावले जाऊ लागले !

***

तात्पर्य :

१. नैसर्गिक 'फळां'चेसुद्धा अनैसर्गिक व व्यापारी उपयोगच अलीकडे अधिक 'फलदायी' ठरतात !

२.

९. उपदेश

एक मनुष्य खूप विद्वान व बहुश्रुत होता. 'त्यामुळे' त्याला दुसऱ्यांना उपदेश करण्याची सवय लागली होती. ते काम तो आपले कर्तव्य समजत असे. तो वेळोवेळी लोकांना उपदेशपर पत्रेही लिहीत असे. पुढे त्याचा व्याप वाढल्याने पत्रे लिहिण्यास व आलेली वाचून दाखवण्यास त्याने एक मदतनीस नेमला.

एके दिवशी त्याला आलेल्या पत्रातले एक पत्र त्याचा मदतनीस त्यास वाचून दाखवीत होता. पत्र फारच चांगले होते. पण ते वाचतावाचता मदतनीस व तो विद्वान मनुष्य चपापून थांबले व एकमेकांकडे पाहू लागले.

त्यांनी पत्राचे मूळ पाकीट उलटसुलट पाहिले. त्यावर दोन्हींकडे पूर्ण पत्ते व्यवस्थित लिहिले होते. फक्त मदतनीसाकडून चुकून तिकीट मागील बाजूस लावले गेले होते. त्यामुळे ते पत्र या माणसासच आले आहे, असे समजून पोस्टाने चुकून ते त्यांना आणून दिले होते. त्यातही पत्त्यावर प्रेषक-प्रति असा उल्लेख नसल्याने हा गोंधळ आणखीच झाला.

वास्तविक ते पत्र कालच त्यांनी एकाला उपदेश म्हणून पाठवले होते. त्यात 'दुसऱ्यास उपदेश करीत सुटणे बेसावधपणाचे असते, त्याने आपले दुहेरी नुकसान कसे होते, त्यासाठी उपाय म्हणून मौन कसे पाळावे' वगैरे सर्व मुद्देसूद लिहिले होते !

पण स्वतःचेच ते पत्र ऐकल्यापासून विद्वानाचे पत्रलेखन मात्र कमी झाले. खरे तर दुसरे दिवशीपासून त्यास मदतनीसाची गरजही उरली नाही. तरीही या विद्वानाने त्यास नोकरीत ठेवले. दरमहा पूर्वीप्रमाणेच तो त्यास पगार देई. फक्त पगाराच्या पाकिटावर 'मेहनताना'

असे न लिहिता तो आता 'गुरुदक्षिणा' असे लिही !

मदतनीस व विद्वान दोघेही आता रोज पत्रलेखनाऐवजी मौन पाळून उपासना करीत!

***

तात्पर्य :

१. विद्वत्तेपेक्षा अनुभव खऱ्या प्रगतीसाठी अधिक मोलाचा असतो !

२. स्वतःचे लेखन इतरांनी वाचल्यास त्यांना होणाऱ्या फायद्याप्रमाणे ते लेखन स्वतः वाचल्यासही फायदे होतात !

३.

१०. भक्तरक्षण

एक तरुण भक्तिमान होता. सुशिक्षित होता. खूप सनदशीर प्रयत्न करूनही त्याला नोकरी मिळेना. त्याच्यावर उपासमारीची वेळ आली. एके दिवशी शेवटचे उरलेले अन्न खाऊन पाणी पिऊन तो अर्धपोटी झोपी गेला. झोपताना त्याने, 'माझे रक्षण आता तूच कर' अशी देवाची प्रार्थना केली !

सकाळसकाळी त्याच्याकडे पोलीस आले. त्यांनी कुठल्या तरी गुन्ह्याचा आळ त्याच्यावर आल्याचे त्याला सांगितले. त्यावरून त्यास अटक करून ते तुरुंगात घेऊन गेले. त्या दिवशी दुपारपासून त्याला मोफत दुपार-संध्याकाळचे जेवण मिळू लागले. विविध तांत्रिक कारणे घडत त्याच्यावरील खटला बराच काळ उभा राहिलाच नाही.

दरम्यान त्याला अटक करणारे अधिकारी व तुरुंगाधिकारी यांच्या बदल्या झाल्या. त्यानंतर अनेक अधिकारी वेळोवेळी येत व बदलून जात होते. दरम्यान, त्याचे कागदपत्र असलेली फाईल गहाळ झाली. त्याचा ठपका कुणावर येऊ नये, म्हणून वर्षानुवर्षे त्याला तसेच तुरुंगात ठेवण्यात आले. तोही रहिवासी असल्यासारखा राहू लागला. तो तेथील काम मात्र प्रामाणिकपणे करी व उरलेला वेळ देवाचे नाव घेत असे. अशा तऱ्हेने त्याच्या वयाची साठी जवळ आली.

अचानकपणे त्याची गहाळ झालेली फाईल सापडली. इतक्या वर्षांचे त्याचे उत्कृष्ट वर्तन व खटल्यात झालेली दिरंगाई यामुळे त्याच्यावरचा खटला तातडीने हाती घेण्यात आला. त्यात तो निर्दोष ठरला !

त्याला सुमारे पस्तीस वर्षे अकारण तुरुंगात काढावी

लागल्याबद्दल न्यायालयाने सरकारवर ठपका ठेवला. त्याचा हा अकारण व अन्याय्य तुरुंगवास तसेच तेथे त्याने प्रामाणिकपणे केलेली कामे ही 'सरकारीसेवा' धरून साठ वर्षे झाल्याने त्याला निवृत्त करून निवृत्तिवेतन द्यावे, असाही आदेश न्यायालयाने सरकारला दिला !

निवृत्तिवेतन घेत आता तो उर्वरित आयुष्य देवाचे नाव घेत घरी जगू लागला.

***

तात्पर्य :

१. देवालादेखील त्या त्या काळातील सरकारी कार्यपद्धती ओळखून भक्ताचे रक्षण करण्याचा मार्ग अवलंबावा लागतो.

२.

११. मोठे घर

एक माणूस तरुणपणी तीन खोल्यांच्या एका घरात राहात असे. तो प्रचंड हुशार व उद्योगी होता. त्यामुळे हळूहळू त्याच्याकडे खूप संपत्ती जमा झाली. त्या संपत्तीचे काय करावे ते त्यास कळेना.

म्हणून त्याने अनेक पर्यायांचा विचार केला. शेवटी त्याने कुणी पाहिले नसेल असे, अनेक मजल्यांचे व असंख्य खोल्यांचे एक प्रचंड घर बांधायचे ठरवले. त्यात त्याच्या आयुष्याचा बराच काळ गेला. त्या प्रचंड घरातली प्रत्येक खोली त्याने सुखसोयीने सुसज्ज केली.

त्या सर्व खोल्यांचा स्वतःस उपयोग कसा करावा, हे त्यास कळेना. म्हणून तो रोज एकेका खोलीत झोपू लागला. एवढ्या प्रचंड घराची काळजी लागून त्याचा रक्तदाब वाढून त्याला हृदयविकार झाला.

एका पहाटे त्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. मदतीसाठी त्याने चलध्वनी(मोबाईल)वरून कसा तरी डॉक्टरांशी संपर्क साधला व तो कोसळला.

डॉक्टरांच्या अख्ख्या पथकाने वैद्यकीय सुविधांसह सर्व मजल्यावरच्या खोल्यांत शोधाशोध सुरू केली. त्या प्रचंड घरात त्याला हुडकताना त्यांचा कितीतरी वेळ गेला. शेवटी त्याची त्या दिवशीची झोपण्याची खोली सापडली. तिच्या दाराजवळ, वेळेत वैद्यकीय मदत न पोचल्याने तो मृत्यू पावला होता.

नंतर त्याच्या उद्योगात काम करणारे अनेक गरीब 'बेघर कामगार' मालकाला श्रद्धांजली वाहण्यास 'कृतज्ञतेने' आले होते !

***

तात्पर्य :

१. पैशाचे काय करावे, हे बरोबर माहीत नसले तर निदान त्याचे 'काहीतरी' करू नये !

२. असल्या प्रचंड घरात आपल्यास नक्की कुठल्या खोलीत झटका येईल याची खात्री नसली तर निदान रोज एकाच खोलीत झोपावे !

३.

१२. प्रगतीसाठी चळवळ

पूर्वी देवाच्या आज्ञेप्रमाणे पृथ्वीच्या सेवेत दोन सूर्य आळीपाळीने काम करीत. त्यामुळे चोवीस तास प्रकाश असल्याने सर्वत्र एकाच प्रकारचे सात्त्विक उद्योग, प्रकाशकृत्ये पृथ्वीवर घडत. त्यामुळे पृथ्वीवरचे 'जीवनमान' साहजिकच 'निकृष्ट' राहून 'विकासदर' कमी राहात असे !

पृथ्वीवरील काही दूरदर्शी समाजशास्त्रज्ञ व अर्थकारणी परग्रहांशी तत्कालीन संपर्कव्यवस्थेमार्फत सतत संपर्कात होते. परग्रहांनी तेथील उच्च जीवनमान व उपाययोजनांची माहिती या दूरदर्शी लोकांना पुरवली. त्यानुसार येथील अडचणींचा अभ्यास करून या अर्थकारणी समाजशास्त्रज्ञांनी देवाकडे एक 'उच्चाधिकार शिष्टमंडळ' पाठवले. त्या शिष्टमंडळाने देवाला दोन शिफारशी केल्या. पहिल्यानुसार दोनपैकी एका सूर्याची बदली लांबच्या सूर्यमंडळात करावी व दुसऱ्यानुसार ते पद प्रायोगिक तत्त्वावर काही काळासाठी रिक्त ठेवावे.

हे शिष्टमंडळ बहुमताचे प्रतिनिधित्व करीत असल्याने व उच्चाधिकार असल्याने देवाने दोन्ही शिफारशी स्वीकारून अंमलात आणल्या. तेव्हापासून पृथ्वीवर रोज नियमाने बाराबारा तास रात्र पडू लागली.

त्यामुळे अनेक रात्रकालीन उद्योग, कृष्णकृत्ये, असात्त्विक उद्योग यांचा आरंभ झाला. बघताबघता त्यांची भरभराट झाली. त्यामुळे पृथ्वीवरच्या लोकांचे 'दरडोई सरासरी उत्पन्न' वाढले ! गुन्हेगारी वाढली, पण तिच्या नियंत्रणासाठी प्रचंड यंत्रणा निर्माण करावी लागली. त्या यंत्रणेत रोजगार व तंत्रज्ञान यांच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या, लोकांचे

'जीवनमान' उंचावले, 'विकासदराने झेप घेतली' !

देवासही या दूरदर्शी लोकांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक वाटले. शिवाय लोकांच्या प्रगतीचा हा मार्ग आपल्यास पूर्वी न सुचल्याबद्दल खेद वाटला! पण त्यास बहुमताचा उपयोग कळून आला !

***

तात्पर्य :

१. सामर्थ्य आहे प्रगतीचे ।
जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे बहुमताचे ।
अधिष्ठान पाहिजे !।।

२.

१३. अंतिम हित

एका देशात बरेच संत होऊन गेले. त्यांच्या पादुकांची संख्या इतक्या मोठ्या प्रमाणात वाढली की त्यामुळे अव्यवस्था, हेवेदावे, गैरव्यवहार वाढू लागले. शेवटी काही भक्तांनी इतर भक्तांकडच्या पादुकांच्या सत्यतेच्या तपासणीसाठी न्यायालयात फिर्याद दाखल केली.

न्यायालयाने पादुकासत्यता आपल्या न्यायालयीन कक्षेबाहेर असल्याच्या कारणावरून खटला स्वर्गन्यायालयाकडे वर्ग केला. बरेचसे संबंधित संत त्यावेळी स्वर्गात असल्याने त्या न्यायालयाने यावर तेथल्या संतांचे म्हणणे मागवले. त्यावर सर्व संतांनी सर्वच पादुका सत्यतेच्या तपासणीसाठी स्वर्गात मागवून घेण्याची स्वर्गन्यायालयास विनंती केली. या विनंतीमुळे फिर्यादी भक्तांसह सर्वच भक्तांना तशा नोटिसा बजावण्यात आल्या.

त्यांनी 'पादुका न पाठवता' स्वर्गन्यायालयात एक 'हरकतअर्ज' दाखल केला. त्यांचा युक्तिवाद होता की या पादुका संतांनी पृथ्वीवर असताना वेळोवेळी भक्तांना 'भेट' दिलेल्या आहेत. भेटकायद्याच्या नियमानुसार एकदा दिलेली वस्तू परत मागता येत नसल्यामुळे संतांची ही विनंती मान्य करू नये!

स्वर्गन्यायालयाने तो अर्ज फेटाळताना म्हटले की, संबंधित भेटवस्तूकायदा स्वर्गन्यायालयास लागू होत नाही! आता मात्र सर्वच भक्तांवर सत्यता तपासणीसाठी पादुका पाठवण्याचे हे 'अस्मानी संकट' आले. 'त्यामुळे' ते सर्व भक्त एक झाले.

त्यांनी सगळ्यांत मिळून पृथ्वीवरील सर्वांत वाकबगार व महागड्या वकिलाकडे आपले वकीलपत्र दिले. सर्व खटल्याचा व संबंधित

बाबींचा विचार करता त्यांनी फिर्यादी भक्तांस विश्वासात घेऊन आपली पुढील योजना सांगितली. ती फिर्यादी भक्तांस 'त्या विशिष्ट परिस्थितीत' मान्यही झाली.

त्या योजनेनुसार खटल्याचा पुढील युक्तिवाद लढवण्याऐवजी या ज्येष्ठ, वाकबगार वकीलसाहेबांनी 'सत्यता तपासणीची आपली मूळ फिर्याद मागे घेण्याची परवानगी देण्याची' त्यांच्या वतीने स्वर्गन्यायालयास विनंती केली. या विनंती अर्जात 'संतांच्या उदार व कोमल हृदयाचा विचार करणे' व भावी काळात या सर्व प्रकारच्या 'पादुकांमुळे भक्ती वाढून भक्तांच्या मुक्तीची वाढणारी शक्यता' हे दोन प्रमुख आधारमुद्दे सविस्तर मांडले.

तसेच त्याचबरोबर सर्वच पादुकाधारी भक्तांचे 'संभाव्य लौकिक अकल्याण' व ' पादुकानिर्मितीच्या उद्योगावर कोसळू शकणारे बेकारीचे संकट' हे दोन उपमुद्देही मांडले. या मुद्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून स्वर्गन्यायालयास फिर्यादी भक्तांस आपली मूळ फिर्याद मागे घेण्यास परवानगी द्यावी असा अर्ज केला. त्याचबरोबर कुठल्याच पादुकांच्या सत्यतेची तपासणी करू नये, अशा सूचनाही सर्व संबंधितांस स्वर्गन्यायालयाने द्याव्या अशीही मागणी केली.

स्वर्गन्यायालयाने यावरही संतांचे म्हणणे मागवले. संतहृदय व भक्ती वाढून भक्तांच्या मुक्तीची भावी काळातली शक्यता या दोनही प्रमुख मुद्यांवर संत सहमत झाले, तसेच फिर्यादी भक्तांची अर्ज करतानाची चूक 'अनवधानाने' झाली असल्याने मूळ अर्ज मागे घेण्यास आपली हरकत नसल्याचे कळवले.

स्वर्गन्यायालयाने सर्व बाजूंचा विचार करून फिर्यादी भक्तांना अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली. तसेच 'कुणीच' कुठल्याच पादुकांच्या

सत्यतेचा प्रश्न काढू नये, अशी सर्वच भक्तांना ताकीदही न्यायालयाने दिली !

सर्व भक्तांत त्यामुळे आनंद पसरला. विशेषतः फिर्यादी भक्तांस 'आपली चूक' कळून आली ! त्यामुळे भक्तांभक्तांतला 'बंधुभाव' वाढल्याचेही आढळू लागले !!

***

तात्पर्य :

१. चुका होतच असतात, पण अंतिम हित खूप गुंतागुंतीचे असते, हे लक्षात ठेवून चुका सुधारण्याकडे कल असणे सर्वांच्याच हिताचे असते.

२. 'बंधुभाव' ही वनस्पती, वनस्पतिशास्त्रज्ञांनाही ओळखण्यात अडचण येणारी वनस्पती असून ती कोणत्या हवामानात वाढू शकेल याचेही भाकीत करता येत नसल्याचे आढळून येते !

३. हीच वनस्पती जगात वेगवेगळ्या प्रांतात 'मनोमीलन, समेट, ऐक्य, सामंजस्य' अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते असे कळते ! मात्र तिची रचना, हेतू इ. 'गुणधर्म' मात्र सारखे असल्याचे आढळून येते !

४.

१४. महाकुशल नोकर

पूर्वीच्या काळी पृथ्वीवर माणसे थोडी होती. ती कष्ट करून एकमेकांना सहकार्य करून गुण्यागोविंदाने राहात. पुढे माणसांची संख्या वाढली. माणसांचे व्याप वाढले. त्यांना नोकरांची गरज भासू लागली. त्यासाठी त्यांनी परग्रहावरून वेगवेगळे नोकर आयात केले. पण कुणात काही, कुणात काही दोष होते, कमतरता होत्या. अखेर एका ग्रहावर त्यांना एक महाकुशल नोकर मिळाला. त्याचे काम माणसांना एकदम पसंत पडले. सर्वसाधारण तो कुठलेही काम करू शके. त्याने माणसाची अनेक कामे हलकी केली. तो कोणाचीही कोणतीही कामे करी. शिवाय तो कुणाकडून कसलीही अपेक्षा बाळगीत नसे. प्रत्येकाला तो नोकर हवाहवासा वाटू लागला.

त्या परग्रहावरून त्याच्यासारखे आणखी काही नोकर मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले. पण त्यांची जमात मर्यादित होती. त्यामुळे अजून थोडेच नोकर उपलब्ध झाले. ते सर्व मात्र इतके कामसू होते की, ते माणसाला कुठले कामच ठेवीनात. फक्त ते मर्यादित असल्याने 'काहीही करून ते मिळवणे' व 'टिकवून धरणे' हेच 'महत्त्वाचे काम' माणसांना उरले. त्यांत मात्र माणसांची स्पर्धा सुरू झाली. माणसांना त्या नोकरांची इतकी सवय झाली की, ते त्यांचे गुलाम झाल्यासारखे झाले !

ते नोकरच हळूहळू माणसाने कसे जगावे, ते ठरवू लागले. माणसाचे खाणेपिणे, आवडीनिवडी, व्यवहार, संबंध सारे कसे असावे याचे निर्णय आता ते नोकरच घेत. ते सर्व निर्णय व कामे मात्र ते बिनबोभाट पार पाडीत. त्यामुळे माणसांना त्यांच्या आज्ञेत राहाणे आवडू लागले. फक्त नोकरांची संख्या कमी असल्याने जरा मनाविरुद्ध

झाले की, ते सोडून जाण्याची आता धमकी देत. हळूहळू त्यांच्याशिवाय जगणे माणसांना शक्य राहिले नाही. हे नोकर मिळवण्यावरून, टिकवण्यावरून माणसामाणसांत भांडणे, वितुष्टे होऊ लागली. नोकरांचे राज्य माणसांवर सुरू झाले.

अशाच एका धनाढ्य माणसाकडे एक नोकर हरप्रयत्नाने त्याने आयुष्यभर टिकवला होता. पुढे त्या माणसाचा अंतकाळ जवळ आला. त्यामुळे 'हा नोकर' आपल्या मुलाबाळांच्या 'सेवेत राहील का' याची त्याला आता तीव्र चिंता वाटू लागली! त्याने नोकरास नाना आमिषे दाखविली. पण तो शब्द देण्यास तयार होईना.

अखेर 'त्या काळजीने खंगून जाऊन' त्या माणसाचा एके दिवशी मृत्यू झाला! नोकर तसा प्रामाणिक होता! तो त्याच्या अंत्यविधीसाठी स्मशानात गेला!

इकडे घरी त्या माणसाची जवळची मंडळी गोळा झाली होती. पुढच्या पिढीत हा नोकर सोडून गेला तर आपले कसे होणार याची सर्वांना काळजी लागली होती. तो सोडून जाईल या कल्पनेनेही त्यांच्या डोळ्यांत पाणी येत होते.

अखेर अंत्यविधी उरकून तो नोकर परत आल्यावर सर्वांनी त्याला अक्षरशः घेराव घातला. अत्यंत काकुळतीने त्या सर्वांनी त्याला पुढच्या पिढीत सर्वांच्या सेवेत राहाण्याची विनंती केली. त्यांचे केविलवाणे आर्जव ऐकून तो म्हणाला,'मी म्हणेन तसे तुमचे वडील वागत, म्हणून मी त्यांच्याकडे इतकी वर्षे राहिलो. मी सांगेन तसे वागण्याचे तुम्ही वचन देत असाल तर मी तुमची विनंती मान्य करतो.'

पुढच्या पिढीत बरोबर राहाण्याचे तो नुसते मान्य करतो आहे म्हटल्यावरच सर्वांनी सुटकेचे निःश्वास टाकले. सर्वांचे चेहरे उजळले.

त्यांनी एकमुखाने त्याचे ऐकण्याला मान्यता दिली. त्या आनंदात तो माणूस वारल्याचे दुःखही ते विसरून गेले !

त्या नोकराचे काम पूर्ववत् सुरू झाले. त्या महाकुशल नोकरांचे नाव होते - 'पैसा !'

***

तात्पर्य :

१. 'कुठेही' मालक दुबळे असले म्हणजे
नोकरशाही पत्करण्यावाचून गत्यंतर नसते !

२. कुशल नोकर ही गरजेची गोष्ट असली तरी
'महाकुशल नोकर' हा उपद्रव ठरू शकतो !

३.

१५. कृपा

ईश्वर आकाशात आहे अशी पूर्वी माणसाची कल्पना होती. त्याच्याबद्दल माणसाला प्रेम व कृतज्ञता वाटे. त्यापोटी ईश्वराला गाठण्यासाठी स्वतःच्या कल्पनेप्रमाणे एक प्रयत्न करायचे त्याने ठरवले. त्याने आकाशाकडे पाहिले. आकाशाच्या उंचीने त्याची छाती दडपली. तरीही त्याने आपला प्रयत्न सुरू केला.

जमिनीत खोल खणून त्याने इमारतीचा पाया घेतला व एकावर एक मजले बांधण्यास सुरुवात केली. इमारत खूप उंच झाल्यावर त्याने एकदा आकाशाकडे पाहिले. आपण आकाशाच्या जवळ जात आहोत, हे त्याच्या लक्षात आले. त्याने नव्या दमाने पुढचे मजले उभारण्यास सुरुवात केली. मजले वर जात होते. माणसाचे आयुष्य कमी होत होते. माणसाची ताकत संपत आली. आता ती पृथ्वीवरची सर्वोच्च इमारत होती. तरीही आकाश हाती लागत नव्हते.

त्या निश्चयी माणसाने ठरवले की, रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत इमारत वर नेत राहायचीच. एक ना एक दिवस आपण आकाश आणि ईश्वर गाठूच. मजले बांधून बांधून एके दिवशी माणसाच्या शक्तीची अखेर आली. त्याच्या ताकतीचा शेवटचा मजला त्याने बांधला. त्याच्या गच्चीवर तो पूर्ण थकून उताणा झोपला. आकाश आता खूपच जवळ आले असेल,अशा कल्पनेने त्याने आकाशाकडे पाहिले. जमिनीवरून दिसत होते त्यापेक्षाही आकाश आणखी उंच दिसत होते!

माणसाचे सर्वस्व संपले. त्याने आकाशाकडे बघून हात जोडले. मनोमन शरणागती पत्करली. आर्ततेने तो ईश्वराला म्हणाला,'माझे सर्वस्व संपले. मी तुला शरण आहे. माझ्या प्रयत्नांची मी पराकाष्ठा

केली. मी तुला गाठू शकलो नाही. आता तूच पहा. माझ्यात आता डोळे उघडायचेही त्राण राहिले नाही', असे म्हणत त्याने डोळे मिटून घेतले !

क्षणात त्याला आपल्याला कुणी तरी विलक्षण प्रेमाने जवळ घेऊन डोक्यावरून हात फिरवते आहे, असे वाटले. त्याला त्या स्पर्शाने संजीवनी दिली. त्याने पाहिले त्याच्या आजूबाजूला सर्वत्र आकाश होते. आकाशाचा असा निकट स्पर्श त्याने अनुभवला नव्हता. तो सावध पण अत्यंत तृप्त होता!

त्याने ईश्वराचा आवाज ऐकला,'बाळा,'प्रयत्न आणि शरणागतीनेच' मी 'जवळ येऊ शकतो'. इतर कशाने नाही. तू ती दोन्ही केलीस. या दोन्हींनीही मी 'जवळ येऊ शकतो' पण 'मला गाठता येत नाही'. मला गाठणे केवळ माझ्या कृपेनेच शक्य आहे! पण प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा शरणागत झाल्याशिवाय मला कृपाही करता येत नाही!'

***

तात्पर्य :

१. प्रयत्नांची पराकाष्ठा व पूर्ण शरणागती एवढे आपल्या हाती असलेले काम आहे. ते करतो, तेव्हा कृपा तयारच असते.

२.

१६. खरे उत्तर

एक माणूस सुखाच्या आशेने अनेक गोष्टी करी. त्याने उत्तम पगार मिळवून देण्याची खात्री देणाऱ्या उच्चशिक्षणास कष्टाने प्रवेश घेतला होता. त्याचा जवळचा मित्र तेथे त्याला भेटण्यास गेला. मित्राने त्याला विचारले,'तू सुखी आहेस का?' तो म्हणाला,'अजून माझ्या हातात नोकरी नसल्याने मी याचे खरे उत्तर देऊ शकत नाही!'

पुढे त्याला एक वेगळीच नोकरी पत्करावी लागली. त्याचा तो जवळचा मित्र त्याला भेटण्यास ऑफिसवर गेला.

मित्राने त्या माणसाला 'तू सुखी आहेस का?' असे विचारले. तो माणूस म्हणाला, 'आत्ता कार्यालयीन वेळ असल्याने मी तुला याचे खरे उत्तर देऊ शकत नाही !'

पुढे त्या माणसाने विवाह केला. काही दिवसांनी हा मित्र त्याच्या घरी गेला. तेथे मित्राने त्याला 'तू सुखी आहेस का?' हा प्रश्न विचारला. त्यावर,'भिंतीला कान असतात, म्हणून या प्रश्नाचे खरे उत्तर मी देऊ शकत नाही' असे त्याने मित्राला सांगितले.

पुढे त्या माणसाला मुलगा झाला. तो जरा मोठा झाल्यावर या मित्राची त्याच्या घरी खेप झाली. तेव्हाही मित्राने 'तू सुखी आहेस का?' हा प्रश्न विचारल्यावर त्या माणसाने सांगितले की,'बालमनावर परिणाम होऊ नये, म्हणून मी याचे खरे उत्तर देऊ शकत नाही.'

पुढे मुलगा मोठा होऊन सर्वांच्या पसंतीची सून घरी आली. मित्राने त्या माणसाला पुन्हा तोच प्रश्न विचारला. तो माणूस म्हणाला,'नव्या माणसाचे मन दुखविणे परवडणारे नाही, म्हणून या प्रश्नाचे खरे उत्तर मी देऊ शकत नाही !'

अखेर तो माणूस वारला. अंत्यविधीस गेलेल्या मित्राच्या मनात तेव्हाही 'आता तू सुखी आहेस का?' हा प्रश्न आला.

तो माणूस चितेवरून मूकपणाने त्या प्रश्नाचे 'नकारात्मक खरे उत्तर' आता कोणतेही कारण न सांगता देत आहे, असे त्या मित्रास ऐकू आले !

***

तात्पर्य :

१. प्रपंचात असल्या प्रश्नांची खरी उत्तरे अनेकदा मूकपणानेच दिली जाऊ शकतात.

२.

१७. वास्तववादी दृष्टिकोन

देवाने उत्कृष्ट जीव म्हणून माणसाची निर्मिती केली. डोळ्यांपाशी काम अडले. उत्कृष्ट प्रतीची लेन्स बसवल्यावर माणसाला त्याने 'काय दिसते, ओळखते' असे विचारले. तेव्हा तो 'आपण सारे जग पाहू शकतो, ओळखू शकतो' असे म्हणू लागला.

त्याने स्वतःसही पहावे, ओळखावे अशी देवाची अपेक्षा होती. ती पुरी व्हावी म्हणून देवाने पुन्हा लेन्सवर बरेच संशोधन केले. पण तशी लेन्स त्यास बनवता येईना. शेवटी त्याने इतर सृष्टिनिर्मात्यांशी संपर्क साधला.ती अडचण त्यांना पूर्वीच येऊन गेली होती, असे त्याला कळले. त्यावर उपाय शोधून त्यांनी एक लेन्स बनवली असल्याचेही देवाला कळले. देवाने ती इम्पोर्टेड लेन्स मागवून माणसाला बसवून पाहिली. लगेच माणूस म्हणाला,'आता मी जगास व स्वतःसही पाहू शकतो, ओळखू शकतो!'

देवाने खूष होऊन तशा लेन्स आयात करून मनुष्यनिर्मिती मोठ्या प्रमाणावर सुरू केली. पण पुढे अनेक वर्षे गेली तरी स्वतःस ओळखत असल्याची लक्षणे माणसाच्या वर्तनात दिसेनात ! हे कळण्यास देवासही खूप वर्षे लागली !!

त्याने लगेच लेन्स पुरवणाऱ्या सृष्टिनिर्मात्याशी संपर्क साधला. तेव्हा त्यांनी खुलासा केला की, मूळ अडचणीवर त्यांचे संशोधन अजूनही सुरू आहे. त्यावर मार्ग अजूनही निघाला नाही. तोपर्यंत त्यांनी बनवलेली व देवास पाठवलेली ती लेन्स फक्त जगास व स्वतःस पाहिल्याचा व ओळखल्याचा 'भास'त्याच्याठिकाणी निर्माण करू शकते ! सध्या एवढेच संशोधन झाले आहे. आम्ही आमच्या मनुष्यसृष्टीसही तीच वापरतो व

तुम्हांसही तीच पुरवीत आलो आहोत. लेन्सचे पुढील संशोधन होताच तुमची मागणी नोंदवून घेत आहोत!

तेव्हापासून माणसाला आपल्यास जग कळते व आपण स्वत:सही ओळखतो असे भास होतात!!

***

तात्पर्य :

१. पर्यायी प्रगत व्यवस्था होईपर्यंत आपण जगास व स्वत:स चांगले ओळखतो, अशा भ्रमात राहाण्याशिवाय सध्या तरी माणसाला पर्याय नाही !

२.

१८. जबाबदारी

एका गावी एक साधू राहात. त्यांनी ईश्वरप्राप्तीसाठी कसे वागावे यावर एक ग्रंथ लिहिला. त्याच्या श्रवणासाठी लोक त्यांच्याकडे जात. पण तो ग्रंथ 'खूप सोप्या भाषेत' असल्याने तो कळत जात असे !

'त्यामुळे' हळूहळू तेथे येणारे लोक कमी होत गेले ! त्या साधूला ईशस्मरणात राहण्यास जास्त वेळ मिळू लागला !!

***

तात्पर्य :

१. कळले म्हणजे अकारणच आपल्यावर वागण्याची जबाबदारी येते, हे वेळीच ओळखून शहाणी माणसे 'त्याप्रमाणे' कृती करतात !

२.

१९. उद्दिष्टपूर्ती

फार पूर्वी एक देश होता. तेथे लोकसेवेसाठी खूप प्रकारची खाती होती. तेथील 'जनरीतीप्रमाणे' तेथे भ्रष्टाचार चालत असे ! उद्दिष्टाप्रमाणे कामे करण्याची सर्वांना सवय असल्याने एका विभागात भ्रष्टाचाराचेही अंतर्गत उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. अर्धवर्षअखेरीस त्याचा खासगी आढावा घेण्यात आला. तेव्हा हे उद्दिष्ट आपण गाठू शकणार नाही, हे अधिकाऱ्यांच्या लक्षात आले.

त्यावर उपाय म्हणून पुढील सहा महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने खात्यात कुशल लोकांची भरती करून हे उद्दिष्ट पुरे करण्याचे ठरले. त्यासाठी जलद गतीने भ्रष्टाचार करू शकणाऱ्यांकडून बयाणा रकमेसह टेंडर्स मागवण्याचे ठरले. त्या कामासाठी त्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची एक समिती नेमण्यात आली.

दरम्यान, इतर विभागांना या विभागास 'सर्व अनुकूलता असूनही' उद्दिष्टपूर्तीत येऊ घातलेल्या अपयशाची कुणकुण लागली! त्या विभागांत या विभागाची पत जाऊ लागली! हा विभाग अकार्यक्षम असल्याची कुजबूज होऊ लागली!

आपल्या विभागावर सोपवलेले एखादे उद्दिष्ट पुरे करण्यात आपण कमी पडलो, शिवाय त्यामुळे विभागातील सर्वच कर्मचाऱ्यांचे राहणीमान खालावत आहे, विशेषतः आपल्या विभागाचे नाव जात आहे, याचे शल्य जास्त करून त्या समितीस, हे काम करताना फारच जाणवले. कारण या कामासाठी बाहेरचे कुशल लोक घेण्याची पाळी आता टेंडरसमितीमुळे त्यांच्यावर आली होती. शेवटी त्यांनी 'स्वाभिमानाने' आपले सर्व कौशल्य पणाला लावायचे ठरवले.

सर्व टेंडरप्रक्रिया पूर्ण झाली. पण ते काम कंत्राटदारांना कधीच मिळाले नाही. इकडे विभागाची मात्र खासगी उद्दिष्टपूर्ती झाली होती! त्यामुळे विभागाची पत वाचली. विभागात सर्वत्र आनंद झाला. उद्दिष्ट इतक्या जलद कसे आटोक्यात आले, हे नंतर समितीसदस्यांकडून खासगीतून कळले. त्यांनी नुसत्या टेंडरप्रक्रियेतच कौशल्याने परिश्रम करून भ्रष्टाचाराच्या वर्षाच्या उद्दिष्टाची पूर्ती केली होती.

या यशाबद्दल विभागात सर्वत्र वेगवेगळ्या मार्गाने आनंद 'साजरा' करण्यात आला !

***

तात्पर्य :

१. 'यत्न' तो देव जाणावा।
'स्वाभिमान' (?) धरिता बरे ! ।।

२.

२०. देवळातला देव

सर्व सृष्टीची देवाने निर्मिती केली. त्या सृष्टीमध्ये तो सर्वत्र संचार करीत असे. झाडपेड, दगडमाती, पशुपक्षी, जातपात, माणूसकिडामुंगी कसलाही भेदाभेद न करता तो सर्वांत मिसळे व सर्वत्र राही. सर्वांना केव्हाही त्याची भेट सुलभ होई.

पण त्यामुळे 'अडीअडचणीत असलेल्या' लोकांची पंचाईत होई. त्यांना ऐन वेळेला देव शोधणे व खासगीत त्याची भेट घेणे कठीण जाई !

म्हणून त्यांनी एकदा एकत्र येऊन देवास प्रार्थना केली आणि त्यास 'एका ठिकाणी राहाण्याची' विनंती केली. त्याच्या राहाण्याची, वस्त्राची,जेवणाची,झोपेची सोय असलेले'देऊळ'त्यांनी त्याला दिले !

देव सरळ असल्याने व तो सर्वांप्रमाणेच या अडचणीवाल्यांचाही असल्याने तो देवळात राहू लागला. त्यामुळे या सर्व अडअडचणवाल्यांची कायमची सोय झाली. 'त्याचा खर्चही' ते करू लागले !

मात्र इतर चराचर सृष्टीला त्याची भेट दुर्लभ झाली. त्यांनीही त्याच्याकडे मनोमन प्रार्थना केली. तेव्हा देवास दोघांचीही सोय पाहाणे आवश्यक वाटले.

दोघांचीही सोय व्हावी म्हणून त्याने मध्यममार्ग अवलंबायचे ठरवले. त्याने चराचर सृष्टीला असा वर दिला की, माझे स्मरण केल्यास कुणासही, कोठेही, कोणत्यातरी रूपात माझी भेट होईल.

तेव्हापासून कोणीही त्याच्या नावाचे जरी स्मरण केले तरी तो कोणासही, केव्हाही भेटू लागला.

***

तात्पर्य :

१. अडीअडचणीला आपल्याला देव भेटल्याची खात्री व्हावी म्हणून आपल्यास देवळात व स्मरणाने सर्वत्र सर्वांस असे भेटण्याचा प्रघात देवाने सुरू ठेवला आहे !

२.

२१. कायदेशिक्षण

एक राज्य होते. तेथे सर्वत्र सुव्यवस्था राहावी व प्रगती व्हावी म्हणून खूप कायदे करण्यात आले होते. त्याची माहिती सर्वांना नीट व्हावी म्हणून एका कायदेतज्ज्ञाने 'कायदे शिकवण्याची' शाळा काढली. त्यात तो विनामूल्य कायदेशिक्षण देत असे. तरी त्याला विद्यार्थी मिळेनात. अखेर ती शाळा बंद पडण्याच्या बेतात आली.

तो तज्ज्ञ असल्याने त्याने अभ्यास केला. त्याने शाळेचा अभ्यासक्रम बदलण्याचे ठरवले. नव्या अभ्याक्रमानुसार तो आता 'कायद्यातील पळवाटा' शिकवण्याचे काम करू लागला. या अध्यापनासाठी त्याने आता फीसुद्धा ठेवली.

त्याची शाळा जूनला सुरू होत असे. पण हा नवा अभ्यासक्रम सुरू केल्यापासून त्याच्या शाळेच्या प्रवेशासाठी मार्चमध्येच रांगा लागल्या व अखेर त्याला मार्चमध्येच प्रवेश बंद करावा लागला !

आता त्याचे उत्तम चालू लागले.

***

तात्पर्य :

१. पळवाटांचे व्यवस्थित ज्ञान असल्याशिवाय अलीकडे नुसत्या कायदेज्ञानाचा फारसा उपयोग नसतो !

२.

२२. सैन्यातली नोकरी

कॉलेजमधल्या दोन मैत्रिणी पंचवीसतीस वर्षांनी एका गावी एकत्र राहाण्यास आल्या. त्यांची पुन्हा ओळख, भेट झाली. एके दिवशी पहिली मैत्रीण आवरून बाहेर जाण्याच्या तयारीत गेटजवळ उभी होती. तेवढ्यात दुसरी मैत्रीण तिच्या यजमानांबरोबर तेथे आली. तीही फिरायला निघाली होती. बोलता बोलता त्या दोघांबरोबर ही पहिली मैत्रीणही पुढे चालत गेली.

पाच मिनिटांनी आपले यजमान बरोबर नसल्याचे तिच्या लक्षात आले व तिच्या मैत्रिणीच्याही. पण दुसरीला वाटले, ही एकटीच फिरायला जायची असेल. ते नसल्याचे लक्षात आल्यावर दोघीही थबकल्या. दुसरीचे यजमानही थांबले. दुसरीने पहिल्या मैत्रिणीला विचारले,'ते यायचे ठरले नव्हते का ?' पहिली म्हणाली,'अग, तसे नाही. आम्ही दोघेही फिरायला जायचे ठरले होते. फक्त मी निघताना त्यांना बरोबर निघण्याची 'ऑर्डर' देण्यास विसरले ! एक मिनिटात मी 'ऑर्डर' देऊन येते !'

थक्क झालेल्या दुसऱ्या मैत्रिणीने पहिलीला परतताना क्षणभर थांबवीत विचारले,'किती भाग्यवान आहेस ! इतके ते तुझ्या आज्ञेत असतात?'

पहिली म्हणाली,'अग, कुठले काय, सगळा ताप आहे. कुठला म्हणून स्वतंत्र विचार नाही की अंमल नाही. दूधसुद्धा उतू गेलेले पहात बसतात, गॅस बंद करायची 'ऑर्डर' नाही म्हणून ! त्यांची सगळी नोकरी सैन्यात झाली ना !'

***

तात्पर्य :

१. जुन्या काळात सैन्यातून निवृत्त होताना, आपले घरी वापरण्याचे पोषाख परत घेतात. त्याबरोबर आपली स्वतंत्र विचार, निर्णय व अंमल करण्याची बुद्धी उरलेल्या आयुष्यात वापरण्यासाठी परत घेण्याचेच काही लोक विसरतात !

२. असेच त्या त्या नोकरीप्रमाणे अनेक नोकऱ्यांत व व्यवसायात इतर बाबतीतही होते !

३.

२३. उद्योगशीलता !

एक मनुष्य स्वतःला 'उद्योगशील' समजत असे ! त्याच्या भागात एक नवे मंदिर झाल्याचे त्याला कळले. ते बरेच आकर्षक व शोभिवंत असल्याचे कळल्याने ते 'पाहाण्या'साठी तो एका संध्याकाळी तेथे गेला.

तेथे कामावरून दमूनभागून आलेला एक माणूस हातपाय धुऊन दर्शनास आलेला त्याने पाहिला. दर्शनानंतर तो माणूस एका कोपऱ्यात माळ घेऊन देवाचे नामस्मरण करण्यास बसला.

त्या माणसाकडे पाहून या 'उद्योगशील' माणसाने नाक मुरडले व तो स्वतः मंदिराचे निरीक्षण करू लागला. तेथील भिंती, खांब, कलाकुसर, रंगकाम, कळस, प्रदक्षिणामार्ग अशा अनेक गोष्टींची शोभा पाहाण्यात त्याचा तासभर कसा गेला, ते त्यास कळलेही नाही. शेवटी त्याने मूर्तीचेही निरीक्षण केले.

परतताना त्याने पाहिले तर तो आधीचा जपमाळ करणारा माणूस एक तासाचा नामजप संपवून उठला होता आणि दिवसाचा सारा शीण निघून जाऊन प्रसन्नपणे देवास साष्टांग नमस्कार करीत होता. हा उद्योगशील माणूस जाताना या जपमाळ करणाऱ्या माणसाकडे बघून पुटपुटला,'माळा ओढीत बसणे म्हणजे निरुद्योगी लोकांची कामे आहेत ही !'

नंतर हा 'उद्योगशील' माणूस घरी पोचला. तेव्हा रात्र पडली होती. त्याने जेवण केले. रात्री नऊ वाजल्यापासून पहाटेपर्यंत जागून त्याने दूरदर्शनसमोर बैठक मारून एक क्रिकेटची मॅच पाहिली. ती 'कुठल्या तरी दोन देशांतली' होती. अखेर त्यांतला 'एक कुठला तरी देश'

जिंकल्याच्या आनंदात तो झोपी गेला! तो जागरण झाल्यामुळे सकाळी नऊला उठला!!

तो 'निरुद्योगी' माणूस मात्र सकाळच्या जपमाळा करून आठ वाजता आपल्या कामास गेला !

***

तात्पर्य :

१. व्यक्ती व समाजाच्या दृष्टीने जपासारख्या सात्त्विक कृती व कर्तव्याचरण असल्या 'उद्योगशीलते'पेक्षा अधिक हिताचे ठरते !

२.

२४. साधूंचे मोठेपण

एका गावी एक 'खरा साधू' राहात असे. तो 'खरा' असल्यामुळे तो आपले मोठेपण कुणाला सांगत नसे व कोणती जाहिरातही करीत नसे ! त्यामुळे गावातले कुणी त्याच्याकडे येत नसे. साधू आनंदात असे!

एकदा परगावचे काही लोक त्याच्याकडे येऊन त्याच्या पाया पडताना गावातल्या लोकांनी पाहिले. पुन्हा काही दिवसांनी असेच घडताना गावातल्या लोकांनी पाहिले. असे अधूनमधून होऊ लागले. साधू नेहमीप्रमाणेच आनंदात होता !

हे पाहून एके दिवशी गावातले लोक साधूच्या पाया पडण्यास आले, इतकेच नव्हे तर ते रोज त्याला नमस्कार करण्यास येऊ लागले. तरीही साधू पूर्वीप्रमाणेच आनंदात होता !

***

तात्पर्य :

१. गावच्या लोकांच्या दृष्टीने अलीकडे साधूंचे मोठेपण, हे परगावच्या लोकांवर अवलंबून असते.

२. साधूंचे स्वतःचे मोठेपण मात्र फक्त त्यांच्या 'खऱ्या साधुत्वावर' अवलंबून असते.

३.

२५. अकृतज्ञ लोक

एक विवाहसमारंभ होता. विवाहाची वेळ होताच मुलाला बोलावले गेले. साध्या वेषात मुलगा विवाहवेदीवर सरळ मार्गाने चालत आला. मुलीलाही बोलवताच साधी साडी नेसून, कुंकू लावून ती पटकन विवाहवेदीवर आली. माळ घालताना उभयतांना उचलून धरून त्रास देण्याचा 'आधुनिक अपरिपक्वपणा' कुणी केला नाही ! त्यामुळे उभयतांनी त्यांच्या मित्रमैत्रिणी व आमंत्रितांच्या उपस्थितीत एकमेकांना सहजपणे माळ घातली. त्यामुळे लग्न वेळेत लागले. लोकांनीही, त्यांचा बहुमोल वेळ वाचल्याने, उभयतांना तसेच सर्व संबंधितांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

परंतु मुलाच्या व मुलीच्या आईंचा निरोप घेण्यासाठी मात्र लोकांना थांबावे लागले, कारण 'आई'चा मेकअप् व्हायचा होता ! त्यामुळे लग्न लागल्यावर सुमारे अर्ध्या तासाने त्या बाहेर येऊ शकल्या. तोपर्यंत निरोप घ्यायला थांबलेले बरेच लोक कंटाळून निघून गेले होते.

त्यावर नाराज होऊन त्या विहिणी एकमेकींस म्हणाल्या, 'अलीकडे कोणाला दुसऱ्यांच्या कष्टांची जाणीवच राहिली नाही !'

***

तात्पर्य :

१. जगात 'अकृतज्ञ' लोक असतात
   हे ओळखूनच लोकांसाठी कामे करावी.
२. सुज्ञ लोक स्वतःसाठी कामे करतात व त्यामुळे त्यांना
   कर्तव्यांपलीकडे फारसा ताण पडत नाही !
३.

२६. थोडी हुशारी

एक माणूस सहज घराच्या खिडकीशी आला. त्याने खिडकीतून रस्त्यावर पाहिले. तेथे एकामागून एक माणसे पळत जाताना त्याने पाहिली. थोडा वेळ कुतूहलाने त्याने ते दृश्य पाहिले. पण त्या पळणाऱ्या माणसांकडे नुसते पाहाणे त्याला 'हळूहळू कठीण' होऊ लागले !

त्याने बाहेर जाण्याचे कपडे चढवले. चपला अडकवल्या. बाहेर आल्यावर रस्त्यावरच्या पळणाऱ्या माणसाला थांबवून, हे काय आहे, ते विचारण्याचा त्याने प्रयत्न केला.

पण कुणी थांबून सांगायला तयार होईना. अखेर त्याने त्यांच्याबरोबर पळायला सुरुवात केली. पळतापळता त्याने भेटणाऱ्याला विचारावयास सुरुवात केली. जो तो पुढच्याकडे बोट दाखवी.

अखेर त्याने वेगाने पळून प्रत्येकाला मागे टाकले. सर्वांत पुढे पळणाऱ्याला गाठून त्याला त्याने पळण्याचे कारण विचारले. तो म्हणाला 'माझ्या मागच्या फक्त एका माणसाला मी माझ्या मागे पळण्यास सांगितले आहे. पुरेसे लोक पळत आल्यावर त्यांना एकत्र करून आम्ही एका उत्पादनाची जाहिरात करणार आहोत!'

***

तात्पर्य :

1. W6> hp>mar Agë` rg bmbbSSmni m`bmbmdZ
   'पुढे' कोणतीही वस्तूसुद्धा विकता येते !

२.

२७. अखेरची करुणा

शेकडो वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एके गावी एक निःस्पृह साधू राहात असे. स्वतःच्या आईवडीलभावंडांच्या प्रापंचिक जबाबदाऱ्या त्याने व्यवस्थित पार पाडल्या होत्या. त्यानंतर तो स्वतः संन्यस्त राहिला होता.

आता मात्र सर्व वेळ त्याने ईश्वरस्मरण व चिंतनास वाहिला होता. अगणित लोक त्याच्या भेटीला येत. त्याच्या उपदेशाचे श्रवण करीत. तोही मोठ्या करुणामयतेने त्यांना वेळ देई, त्यांचे शंकासमाधान करी.

लोकांना सन्मार्ग लाभून ते तृप्त होऊन आपापल्या गावी जात. आपापल्या ठिकाणी साधूने केलेल्या उपदेशाचे पालन करून स्वतःचे व प्रपंचाचे कल्याण करून घेत. साधनेने स्वतःचा उद्धारही करीत.

साधूच्याजवळ मात्र एक शिष्य नेहमी वास्तव्य करून राही. त्याच्या कानांवर भरपूर उपदेश अनेक वर्षे पडत असे. साधूचे आचरण तो अनेक वर्षे पाहात असे. तरी तो स्वतः मात्र त्या उपदेशाचे पालन कधी करीत नसे ! त्यामुळे तो वृत्तीनेही होता तसाच राहिला होता!

तो जमेल तेव्हा साधूची थोडीफार सेवा करी, कुठली साधना करीत नसे. त्याच्या पोटापाण्याची सोय मात्र साधूच्या संगतीत राहिल्यामुळे उत्तम होत असे. या सगळ्यामुळे जगालाही तो आवडत नसे व साधनी माणसांनाही. त्याच्याकडे बघून त्या साधूलाही फार वाईट वाटे.

अखेर साधू देहाने थकला. त्याच्या आयुष्याची अखेर आली. हे कळल्यावर मात्र हा मठ्ठ शिष्य अस्वस्थ झाला. आपले आता पुढे कसे

होणार याची त्याला तीव्र चिंता वाटू लागली.

त्याने एके दिवशी साधूस म्हटले,'आजवर तुम्ही होता म्हणून इतके लोक येत होते. ते जी फळफळावळ, वस्तू आणीत त्यावर माझा उदरनिर्वाह होई. आता तुम्ही गेल्यावर कोणी येणार नाही. मी पुढे कसा जगू ? शिवाय मी एवढी उपासनाही केली नाही किंवा करू शकत नाही की जिच्या जोरावर लोक येतील किंवा देव माझे पोट भरील! मी काय करू ?'

त्याची केविलवाणी नजर पाहून साधूच्या आधीच्याच कोमल हृदयात कालवाकालव झाली. त्याने मनाशी काही विचार केला. खोल गेलेल्या आवाजात त्याने शिष्याला म्हटले की गावातल्या त्या चित्रकारास बोलावून आण. साधूचे त्याच्याकडे काय काम असेल असे शिष्याला वाटले, कारण साधूने आजवर स्वतःचे चित्र कधीच कोणास काढू दिले नव्हते. तरी साधूच्या सांगण्याप्रमाणे त्याने चित्रकारास ताबडतोब बोलावले. तो सर्व साहित्य घेऊन आला.

साधूने त्यास स्वतःचे चित्र काढण्यास सांगितले. त्या कसबी चित्रकाराने साधूचे उत्कृष्ट चित्र काही तासांत काढून दिले. त्यास मेहनताना देऊन साधूने त्यास जाण्यास सांगितले.

चित्रकार गेल्यावर साधूने त्या चित्राखाली स्वतःची सही केली. ते चित्र त्याने त्या शिष्यास घेण्यास सांगितले व म्हणाला, हे येथे ठेवून याची तू सेवा कर. म्हणजे तुला निर्वाहाची चिंता करावी लागणार नाही. कारण असे चित्र कोठे नाही ! लोक हे चित्र पाहाण्यास येतील !

साधनेच्या दृष्टीने मठ्ठ असलेल्या त्या शिष्यावर 'अखेरची करुणा' करून साधूने ईशस्मरणात तत्काळ देह ठेवला.

***

तात्पर्य :

१. अपात्र लोकांस जग झिडकारते, पण साधू मात्र त्यांस जवळ करतात व त्यांवर जी कृपा करणे शक्य आहे, ती करतात.

२.

२८. आजचे चमत्कार

एकदा एक माणूस एका राज्यातल्या सरकारी कार्यालयात गेला. तेथे संबंधित टेबलावरचा माणूस हजर होता! त्याच्याकडे या कामासाठी आल्याबद्दल त्याने या ग्राहकाचे आभार मानले ! त्याचे काम करून त्याने स्वतः ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नेले. वरिष्ठ अधिकारी कुठल्या मिटिंगमध्ये नसून त्यांच्या खुर्चीत हजर होते. ते कामास तत्पर होते. त्यांनी ते कागद पाहून त्यावर लगेच सहीशिक्का करून ते थेट परत दिले.

आपले झालेल्या कामाचे कागदपत्र घेऊन तो माणूस एका तासात, कुठलाही 'अवाजवी व्यय' न होता, आनंदाने घरी परतला !

***

तात्पर्य :

१. चमत्कार फक्त जुन्या पुराणकाळातच होत होते असे नाही !

२. पुराणात वर्णन केलेले चमत्कार खरे असावेत !

३.

२९. संकटातून सुटका

एका देशात लोक दूरदर्शन संच सतत पहात राहात. त्यामुळे ते संच तापून वितळण्याचा धोका निर्माण झाला. म्हणून सर्व संचांनी एकत्र येऊन या संकटातून सुटकेसाठी देवाला साकडे घातले.

देव म्हणाला, मी माणसांची संच पाहाण्याची चटक कमी करू शकत नाही. पण मी तुम्हाला काही तरी करून संकटातून वाचवीन. नंतर विजेवर चालणारी इतर अनेक उपकरणे शोधण्याची बुद्धी देवाने शास्त्रज्ञांना दिली. तसेच त्या त्या उपकरणांची चटक लोकांना लावण्याची युक्ती जाहिरातदारांना दिली. त्यामुळे अशी असंख्य उपकरणे अमाप खपली. साहजिकच विजेचा वापर इतका वाढला की, वीज सक्तीने बंद ठेवण्यापलीकडे देशाच्या शासनास मार्ग उरला नाही. बंद ठेवताठेवता अखेर वीज एका वेळी सलगपणे फक्त दोनच तास चालू राहू लागली.

त्यामुळे दोन तासांच्यावर वीजच नसल्याने संचच लोकांना वापरता येईनात. ते तापणे कमी झाले व वितळण्याच्या संकटातून देवाने संचांची अशी सुटका केली !

***

तात्पर्य :

१. माणसे वेडेपणाने दुसऱ्यास संकटात टाकतात,
तेव्हा देव भक्तांची सुटका करतो.

२.

३०. कलियुगातले कल्याण

एक थोर गुरू होते. ते सदैव उपासनेत राहात. त्यांच्याकडे हळूहळू खूप शिष्य येऊ लागले. त्या अशांततेमुळे गुरूंचेही उपासनेत लक्ष लागेना.

गुरू आधुनिक काळातले असल्याने त्यांनी सर्व शिष्यांना एकत्र बोलविले व शिष्यांनाच यावर उपाय विचारला. बहुतेक शिष्यांनी सांगितले की वाढणाऱ्या गर्दीमुळे येथे व्यवस्थापनाची गरज आहे. आपण आम्हास ते काम करण्याचा पर्याय दिल्यास आम्ही त्यास तयार आहोत.

'शिष्यांची आज्ञा' प्रमाण मानून गुरूंनी 'आज्ञा केली' की, ज्यांना येथील व्यवस्थापनाचे काम करायचे आहे त्यांनी डावीकडे उभे राहावे. ज्यांना उपासना करायची आहे त्यांनी उजवीकडे उभे राहावे.

संधी मिळताच जवळजवळ सर्व शिष्यांनी व्यवस्थापन पत्करले व ते डावीकडे उभे राहिले. उजवीकडे तीनचारच शिष्य उरले. ते थोडेच असल्याने गुरूंनी त्यांना आपल्याबरोबर स्वतःच्याच खोलीत ठेवून घेतले.

त्या तळमळीच्या शिष्यांसमवेत गुरूंचा वेळ पूर्वीपेक्षाही शांततेत, उपासनेत व आनंदात जाऊ लागला. त्या शिष्यांनाही गुरूंच्या सहवासात उपासना करण्याची दुर्लभ संधी मिळू लागली. त्यामुळे त्यांना उपासनेचा दुर्मीळ आनंद आणखीच मिळू लागला !

बाकी सर्व शिष्यांनाही 'गुरुआज्ञे'प्रमाणे काम करण्याचा आनंद मिळून सर्व परिसराचे व्यवस्थापन उत्तम होऊन सर्वत्र शिस्त व शांतता निर्माण झाली !

***

तात्पर्य :

१. शिष्यांच्या आज्ञेप्रमाणे वागण्यातच 'कलियुगा'त गुरूंचे व शिष्यांचे कल्याण असते !

२. गुरूंना 'शिष्यां'ची पारख असल्यानेच ते गुरू होतात व राहतात.

३. शिष्यांना 'खऱ्या कल्याणा'ची कल्पना नसल्यास ते 'शिष्यच' राहतात.

४.

३१. लोक

एका देशात काही सज्जन, प्रामाणिक व सात्त्विक लोक राहात. शतकानुशतके देशातल्या उरलेल्या लोकांनी त्यांना सरळमार्गाने जगू दिले !

***

तात्पर्य :

१. इतरांच्या 'स्वहिता'स कुठला धोका उत्पन्न करीत नसतील, तर इतर लोक सज्जनांस आजही सज्जनपणे जगू देतात !

२.

३२. न कळणारी गुलामगिरी

एका राज्यात खूप लोक राहात असत. ते गरीब होते. त्यांची आपापसातली भांडणे, त्यांचे अज्ञान यांचा फायदा घेऊन परकीयांनी त्यांच्यावर अनेक वर्षे राज्य केले. त्यांनी लोकांची लूट केली. अनेक अत्याचार, अन्याय केले. इतके की त्यांनी या गुलाम देशाचे नावही बदलून टाकले. त्या देशातल्या लोकांची न्यूनगंड व गुलामीची वृत्ती वाढवील असे शिक्षणही त्यांना ते देत असत.

अखेर अन्यायाला कंटाळून या गरीब लोकांचा स्वाभिमान जागा झाला. या देशातल्या लोकांनी एकत्रित होऊन प्रतिकार केला. परकीयांना हद्दपार केले. सर्वांना स्वातंत्र्य मिळाले. स्वतंत्र झाल्याच्या आनंदात ते लोक बेसावधपणे जगू लागले.

त्यात ते स्वतःच्या देशाचे मूळ नाव देशाला परत देण्याचेही विसरून गेले. परकीयांनी त्यांच्या देशाला दिलेले नावच ते कित्येक वर्षे अभिमानाने वापरीत राहिले. तसेच न्यूनगंड व गुलामी कायम ठेवणारे परकीयांनी रुजवलेले शिक्षणच ते बेसावधपणे वर्षानुवर्षे शिकत राहिले!

***

तात्पर्य :

१. खऱ्या गुलामगिरीविरुद्ध लढाई जिंकत नाही तोवर
खऱ्या स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद दूर असतो.

२.

३३. प्रवचनविद्येची प्रगती

हजारो वर्षांपूर्वी एका देशात काही प्रतिभावान, बुद्धिमान लोक राहात. त्यांना समाजधारणेची व ईशप्राप्तीची काही तत्त्वे चिंतनाने सापडली. त्या तत्त्वांचे आचरण करून त्यांची सत्यता त्यांनी अनुभवली. पुढे इतर जिज्ञासूंना ते ती तत्त्वे समजावून देत. त्यांस लोक प्रवचनकार म्हणू लागले. पुढे या थोर माणसांनी ती तत्त्वे ग्रंथरूपात मांडली. ते ग्रंथ लोकांना उपलब्ध झाले. या प्रवचनकारांना त्यांची विद्या, संशोधन, आचरण, अध्यापन, निरिच्छता - अशा गोष्टींमुळे लोकांकडून मानसन्मान मिळे. राजेमहाराजेही त्यांना धन देत, मान देत, त्यांचा सल्ला घेत.

पुढे त्यांनी लिहिलेले ग्रंथ लोकांना उपलब्ध झाले. ते ग्रंथ वाचून अनेक लोक ते पाठ करीत. या लोकांकडे स्वतंत्र बुद्धी, आचरण, अनुभव यांतले काही नसे. तरीही ती तत्त्वे मात्र ते वाचून, पाठ करून, रंगवून, त्यास गाण्याची, अभिनयाची जोड देऊन लोकांना सांगत. सांगतासांगता या लोकांचीही प्रवचने लोकप्रिय होऊ लागली. परंतु पूर्वापर आचरण, अनुभव, स्वतंत्र बुद्धी वगैरे अटी प्रवचनकारांना गृहीत धरल्या जात असल्याने त्या जुन्या प्रवचनकारांसारखी मान्यता, धन वगैरे गोष्टी लोक या लोकांना देत नसत. त्यामुळे नाराज होऊन त्यांनी एक उपाय शोधला.

त्यांनी प्रवचनकारांची एक संघटना काढली. जुन्यानव्या सर्व प्रवचनकारांना त्याचे सभासद करून घेतले. त्या संस्थेच्या घटनेत तिचे सभासद होण्यासाठी स्वतंत्र बुद्धी, आचरण, अनुभव यांबरोबर गाणे, अभिनय, पाठांतर, दिसणे अशा अनेक गुणांची पात्रताअट ठरवली. सर्व गुण कुणाकडे असणे शक्य नसल्याने यांपैकी कुठल्याही दोन अटी पुऱ्या करणारे सभासद होऊ शकतील असे नमूद केले. जुने प्रवचनकार

उदारहृदयाचे व निरपेक्ष वृत्तीचे असल्याने त्यांनी यास मान्यता दिली. ती सर्वांची प्रातिनिधिक संघटना ठरल्याने तिची सरकारदरबारी नोंद झाली. मान्यताप्राप्त झाल्याने सर्व प्रवचनकारांना सर्व प्रकारच्या सवलती, बिदागी, मान, राज्यपुरस्कार इत्यादी बाबतीत समान वागणूक मिळू लागली.

पुढे काही वर्षांनी जुने आचरणशील प्रवचनकार कमीकमी होत गेले. नव्यांची संख्या मात्र वाढू लागली. आचरण, स्वतंत्र लेखन वगैरे गोष्टी कठीण असल्याने नवे कुणी त्यास तयारही होईना. काहींनी तर असा मुद्दा मांडला की प्रवचनापुढे असल्या गोष्टींस सवडही मिळत नाही. त्याची काळानुसार विशेष गरजही नाही. काहींनी हेही लक्षात आणून दिले की मूळ तत्त्वे बदलत नसल्याने त्यात भर घालण्याची अपेक्षा बाळगणेच चुकीचे आहे. त्यातही आपण प्रवचन करतो तेच मुळात 'लोकांनी' आचरण करण्यासाठी, हेही प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागेल.

शेवटी संघटनेने 'विशेष साधारण सभा' घेऊन वरील 'रास्त' मुद्यांच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र लेखन, तत्त्वशोधन, आचरण, अनुभव असल्या अनेक 'कालबाह्य' अटी, मूळ पात्रता अटींतून काढाव्यात व संघटनेला 'कालोचित स्वरूप' द्यावे असा ठराव आणला. तो 'बहुमताने' पास झाला. आचरणशील वगैरे लोकांची मान्यताही रद्द करावी, अशीही उपसूचना त्यास येऊन तिच्यासह हा ठराव बहुमताने पास झाला. अल्पमतात असल्याने अशा आचरणशील, निःस्पृह वगैरे प्रवचनकारांना त्यास विरोधही करता आला नाही.

अशा लोकांची मान्यता रद्द झाल्याने ते यापुढील कुठल्या लाभांस स्वाभाविकच अपात्र ठरले व ते गरीबीचे जीवन जगू लागले. फक्त ते स्वतंत्र बुद्धीचे असल्याने ते नवनवी तत्त्वे, सत्ये शोधीत, आचरीत व

ग्रथित करीत. ती मात्र या संघटनेस तयार स्वरूपात आयती मिळत.

त्यामुळे संघटना मात्र वेळोवेळी प्रामाणिकपणे अशा जुन्या प्रवचनकारांना कोरडी आभारपत्रे मधूनमधून पाठवी. तेही वृत्तीने निरिच्छ असल्याने त्यावरच संतुष्ट असत. लोकांसही आता रंजक प्रवचनांची आवड लागून ते त्यात रमू लागले !

***

तात्पर्य :

१. कलियुगात आचरण करून तत्त्वे शोधण्यापेक्षा असलेल्याच तत्त्वांच्या प्रचारप्रसाराची किंमत मोठी असते!

२. ऐकणाऱ्यांसही आचरणापेक्षा ऐकण्यातले मनोरंजनच महत्त्वाचे असते !

३.

३४. खरे समाधान

एका मोठ्या माणसाने 'समाधान कसे मिळवावे' यावर एक मोठा ग्रंथ लिहिला. त्याचा खूप खप झाला. त्यातून बरीच प्रसिद्धी व पैसा मिळून तो समाधानी झाला !

समाधानाच्या शोधात असलेल्या एक गरीब माणसाने मोठ्या किंमतीला तो ग्रंथ विकत घेतला. रोज उशाला तो ग्रंथ घेऊन तो झोपत असे. तरी त्याला समाधान होईना. म्हणून त्याने त्या ग्रंथाची पारायणे करायची ठरवली व केली. तरी त्याला समाधान मिळेना. अखेर त्याने तो थोडा ग्रंथ चावून खाल्ला. तरीही समाधान मिळाले नाही.

अखेर शेवटचा उपाय म्हणून त्याने तो ग्रंथ जाळून त्याची राख करून अंगाला फासली. त्याचे ते रूप पाहून लोक त्याच्या दर्शनाला येऊ लागले. त्याला मान मिळू लागला. लोक त्याला वस्तू, पैसे देऊ लागले. तेव्हा तो समाधानी झाला !

काही दिवसांनी पहिल्या लेखक माणसाची प्रसिद्धी ओसरली, पैसा आटला, तो दुःखी झाला! तसेच काही दिवसांनी या गरीब माणसाचे खरे स्वरूप लक्षात येऊन तेथे लोक यायचे कमी झाले व त्याचेही समाधान हरवले !

***

तात्पर्य :

१. खरे शाश्वत समाधान दुर्लभ असून त्याचे मार्ग वेगळे आहेत.

२.

३५. अपारंपरिक उद्योग

एका माणसाने खूप गुंतवणूक करून एक उद्योग काढला. कष्ट व सचोटी यांमुळे तो उद्योग खूप वाढला. त्यापासून त्याला भरपूर पैसा मिळू लागला. परंतु यामुळे त्याला शासन, कामगारनेते, खंडणीवाले यांचा बराच त्रास सुरू झाला. हळूहळू संप, टाळेबंद्या, खटले अशा गोष्टी वाढत जाऊन तो उद्योग बंद पडला.

मग त्याने एक सुबक मूर्ती आणली. थोडीशी गुंतवणूक करून एका मंदिराचा उद्योग सुरू केला. तो चांगला चालला. नफा चांगला होऊ लागला. त्या उद्योगात त्याचा उत्तम जम बसला. या उद्योगात त्याला 'तसा' फारसा त्रासही झाला नाही !

***

तात्पर्य :

१. अपारंपरिक उद्योगांचा विचार करावा !

२. 'खऱ्या' उद्योगाचे घरी रिद्धीसिद्धी पाणी न भरी !

३.

३६. सुखी माणूस

एका माणसाने जवळजवळ पन्नास वर्षे रात्रंदिवस कष्ट करून खूप पैसे साठवले. पुढे तो खूप सुखी झाला, असे असंख्य लोकांत बोलले जात असे !

***

तात्पर्य :

१. 'ऐकीव' गोष्टींवर विश्वास ठेवू नये !

२.

३७. उत्पन्नाचे उपाय

एका राज्यातले सरकार 'विकासाच्या कार्या'वरील व आनुषंगिक 'भ्रष्टाचारा'वरील खर्चांनी कर्जबाजारी झाले. ते सारे प्रजेला माहीत नसले तरी राज्यकर्त्यांच्या ते लक्षात येत असल्याने उत्पन्नाचे नवेनवे मार्ग ते राज्यकर्ते शोधून काढीत. विविध करांचे नेहमीचे पर्याय संपल्यावर, राज्यातल्या परिस्थितीची जाण असलेल्या प्रतिभावान अर्थतज्ज्ञांची एक समिती उत्पन्नाचे नवे उपाय शोधण्यासाठी नेमण्यात आली. तिने देशातल्या सामाजिक व्यवहारांचा व विक्रीकर व्यवस्थेचा सांगोपांग पुनर्विचार केला व उत्पन्नवाढीचा एक नामी उपाय शोधला. हा नवा विक्रीकर लागू झाल्यापासून राज्याचे उत्पन्न प्रचंड प्रमाणात वाढले व राज्य आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाले.

हा कर फक्त असलेल्या 'विक्रीकरां'ची व्याप्ती वाढवणारा होता. अनेक प्रकारच्या विक्री त्यात समाविष्ट करण्यात आल्या होत्या. उदा. मतांची विक्री, देवदर्शनाची विक्री, अवैध वस्तूंची विक्री, बातम्यांच्या मजकुराची व जागेची विक्री, परवान्यांची विक्री, खोट्या बिलांची विक्री, खोट्या नोटांची विक्री, माणसांच्या अवयवांची विक्री, शिक्षणसंस्थेतील प्रवेशजागांची विक्री, त्याचत्याच भूखंडांची व सदनिकांची अनेकांना विक्री, 'खोट्या खटल्यात गोवण्या'साठी तसेच 'खऱ्या खटल्यातून सोडवण्या'साठी कौशल्यांची विक्री, पक्षीय उमेदवाऱ्या तसेच लाभदायक पदांची विक्री - अशा अनंत प्रकारच्या 'काळानुरूप गरजेच्या' झालेल्या व 'सुरू असलेल्या' विक्रीव्यवस्था या कराच्या क्षेत्रात या नव्या कायद्याने आणल्या गेल्या.

सामान्य विक्री व मूल्यवर्धित कराच्या असंख्य पट उत्पन्न आता

या नामी उपायाने वाढून तो देश कर्जमुक्त व त्याचबरोबर सांस्कृतिकदृष्ट्या रसातळाला जाण्यास सक्षम झाला!

त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या देशाला प्रगत स्थानही प्राप्त झाले !

***

तात्पर्य :

१. अंधारप्रकाशाची निसर्गनिर्मित मागास व्यवस्थाही हळूहळू बदलता आली, तर अशा प्रगतिशील मानवांकडून एकतर्फी अंधाराच्या साम्राज्याचा सूर्योदय फार दूर नाही !

२.

३८. घातक जंतू

एका देशात स्वास्थ्य व शांतता नांदे.तेथील लोक गरीब, पण एकमेकांना सहकार्य करून सुखी राहात असत.

पण जगातल्या दुसऱ्या महत्त्वाकांक्षी देशांना ते पाहवेना. मेंदूच्या शास्त्रज्ञांना काही संशोधन करण्यास सांगून त्यांनी एका घातक जंतूची निर्मिती केली. विविध सदिच्छा भेटींच्या वेळी ते जंतू त्यांनी या देशात सोडून दिले. त्या जंतूंचा प्रादुर्भाव या देशातल्या लोकांच्या मेंदूत झपाट्याने झाला. तेव्हापासून या स्वस्थ व शांत देशात अनेक विचित्र गोष्टी घडू लागल्या.

ही लागण होण्यापूर्वी नात्यातल्या शेजारपाजारच्या उपवर मुलींसाठी किंवा मुलांसाठी ते लोक आपण होऊन माहिती देतघेत, वेळी त्यांच्या आईवडिलांबरोबर असे विवाह जमवण्यासाठी वणवण करीत. आता मात्र ते त्यासाठी पैसे मागू लागले !

जिज्ञासू, होतकरू मुलांसाठी जादा शिकवणारे शिक्षक, तज्ज्ञ आता त्यासाठी फी घेऊ लागले! गावात नोकरीसाठी बदलून आलेल्यांना तात्पुरते राहायला भाड्याने जागा मिळवून द्यावी, म्हणून ओळखीच्या घरमालकांकडे त्यांना नेऊन अगत्याने जागा दाखवून व मिळवून देऊन त्यांचा दुवा घेणारे आता मालक व बदलून येणारे दोघांकडूनही ब्रोकरफी वसूल करू लागले !

गावातल्या आजाऱ्याला आपल्याकडच्या रानावनातून स्वतः आणलेल्या किंवा लोकांनी आणून दिलेल्या पाळंमुळ्या देऊन बरे करणारे आता औषधासाठी नुसते पैसेच नव्हे तर बरे करण्यापूर्वीच ॲडव्हान्स्(अग्रिम) रक्कम मागू लागले! एकमेकांच्या घरच्या लग्न-कार्य-

प्रसंग यांसाठी गोळा होऊन राबणारे आता दूर राहणे पसंत करू लागले. असल्या कामांची व्यवस्थापने करणारे लोक आता पैसे देऊन मिळू लागले. मृत्यू तुमच्याकडे - अंत्ययात्रा आमच्याकडे, जन्म तुमच्याकडे - बारसे आमच्याकडे, असल्या असंख्य योजनांच्या जहिराती घरी येऊन पडू लागल्या. पैसे घेऊन या साऱ्या सोयी द्याव्या व कराव्या हे लोकांना सोपे वाटू लागले !

देवाकडे येणाऱ्याचे अगदी गाभारा उघडून स्वागत करणारे आता देवाच्या गावात प्रवेश करण्यापासून गाभाऱ्यापर्यंत वेगवेगळे पैसे वेगवेगळ्या ठिकाणी वसूल करू लागले! इतकेच काय देवाचे फुकाचे नाम व त्याचे महत्त्व सांगायलासुद्धा लोक पैसे घेऊ लागले !

हळूहळू या सर्व लोकांच्या व्यावसायिक स्पर्धा सुरू झाल्या. सर्व लोक एकमेकांना 'गिऱ्हाइके' समजू लागले. एकमेकांना आकर्षित करण्यासाठी स्कीम, ग्रुपबुकिंग, पॅकेज, ऑड्स्, एजंट - अशा अनेक विघातक गोष्टी त्यांच्या समाजात कधी शिरल्या ते या स्वस्थ व सुखी लोकांना कळलेही नाही.

हळूहळू घरोघरी असा मिळवलेला पैसा, लोभ, आसक्ती त्यांतून हेवेदावे, फसवणुकी यांनी धुमाकूळ घातला. मात्र राज्यातला चलनव्यवहार व पैशाची पातळी आंतरराष्ट्रीय प्रमाणावर पोचली. महत्त्वाकांक्षी देशांचे उद्दिष्ट साध्य झाले. त्यांनी या देशाच्या प्रगतीचे कौतुक करून त्याला बेसावध ठेवायला सुरुवात केली.

या देशातल्या लोकांनी मात्र त्यांचे स्वास्थ्य, एकमेकांबद्दलचा जिव्हाळा व शांती गमावली !

या विघातक जंतूचे नाव होते 'व्यवसाय' !

***

तात्पर्य :

१. हा विघातक जंतू खूप 'प्रगत' जंतू असून तो कितीही वेगाने माणसाच्या नकळत स्वतःची वाढ करू शकतो.

२. हा जंतू नातेगोते, अडअडचण, प्रेम, दया, कृतज्ञता, सहानुभूती, परोपकार, देव, माणुसकी - असल्या कुठल्याही 'त्याला प्रतिकूल असलेल्या' हवामानातसुद्धा तग धरून फोफावू शकतो !

३.

३९. आजची वांगी

आधुनिक काळातल्या एका राजाने आपले राज्य सत्याने चालवायचे ठरवले होते. त्यासाठी त्याने सत्याचे कायदे केले होते. फक्त त्या कायद्यात त्याला वाटेल त्या गोष्टींचा त्याने सत्य म्हणून समावेश केला होता. या कायद्यात वांगी चांगली असतात, असा एक कायदा होता.

एके दिवशी एका ज्येष्ठ सचिवाची परीक्षा बघण्यासाठी त्याने विचारले, 'वांग्याची भाजी छान लागते व ती तब्येतीलाही चांगली असते, नाही का?' सचिवाने होकार दिला, 'येस सर.' खूप दिवसांनी त्यांनी त्याच सचिवाला सहज विचारले, 'वांग्याची भाजी चांगली लागत नाही व ती तब्येतीला काही एवढी चांगली नसते, नाही का?' सचिवाने नकार दिला व म्हणाला, 'नाही सर, वांग्याची भाजी छान लागते व ती तब्येतीला चांगली असते.' राजानं त्याच्या 'सत्यप्रियते'वर खूष होऊन, आपल्या सरकारी कोट्यातील एक महागडा भूखंड व एक पेट्रोलपंप त्याला लगेच इनाम म्हणून बक्षीस दिला !

ते सर्व 'त्याच्या नावावर झाल्या'वर आभाराचे पत्र व सोबत राजीनामा व नोटीसपेचा चेक सचिवाकडून राजाकडे पोच झाला! राजा बुचकळ्यात पडला!

पण दोनच दिवसांनी वांग्यांचा व्यापार करणाऱ्या एका 'बहुराष्ट्रीय कंपनी'च्या 'व्यवस्थापकीय संचालकपदी' त्या सचिवाची नियुक्ती झाल्याचे राजाने वृत्तपत्रात वाचले. त्या पदावर या सचिवाला पूर्वीपेक्षा तिप्पट पगार व तोही 'परकीय चलना'त दिला गेला होता !

***

तात्पर्य :

१. राजापेक्षा कायदेशीर सत्याशी, कायदेशीर सत्यापेक्षा देशी वांग्यांशी आणि देशी वांग्यांपेक्षा परदेशी वांग्यांशी एकनिष्ठ राहाणे सध्या दूरदर्शीपणाचे झाले आहे !

२.

४०. पुण्याई

स्वर्गात एक गृहस्थ राहात. पुढे काही वर्षांनी त्यांचा मुलगाही स्वर्गात दाखल होऊन त्यांच्याबरोबर राहाण्यास आला. एकदा त्यांनी जवळपासच्या लोकांना चहापानास बोलावून पेढे दिले. पूर्वी एकदा त्या गृहस्थांनी ते हयात असताना पृथ्वीवरच्या जन्मात दाखल केलेल्या खटल्याचा निकाल लागल्यावर असेच पेढे वाटले होते.

म्हणून लोकांनी अंदाजाने यांच्या तिकडे अलीकडेच राहावयास आलेल्या मुलाच्या खटल्याचा निकाल पृथ्वीवर लागला की काय, असे विचारले. त्यावर ते म्हणाले,'मुलाने घातलेल्या खटल्याचा निकाल तर अजून व्हायचाच आहे, पण तसा माझासुद्धा एक खटला तर अजूनही प्रलंबित आहे!' त्यावर लोक म्हणाले,'मग पेढे कसले ?'

ते म्हणाले,'तेच तर सांगतो. माझा नातू फार भाग्यवान ठरला. तो आता वृद्ध आहे, पण अजून मरायचा आहे. त्याच्याआत आजच त्याच्या एका खटल्याचा निकाल पृथ्वीवर लागला आणि तोही अंतिम कोर्टाचा ! किती पुण्यवान आहे बेटा ! स्वर्गप्राप्तीपूर्वी स्वतःच घातलेल्या खटल्याचा निकाल लागला ! म्हणून तर आम्ही दोघेही इकडे पेढे वाटतो आहोत.'

***

तात्पर्य :

१. स्वर्गात जाण्यास जेवढी पुण्याई लागते,त्यापेक्षा जास्त पुण्याई सामान्य माणसास लवकर न्याय मिळण्यास लागते !

२.

४१. प्रवेशपात्रता

भरपूर पगाराच्या नोकरीची दोनशे टक्के हमी देणाऱ्या एका आधुनिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश द्यायचे होते. प्रवेशासाठी शेकडो अर्ज आले. त्यामुळे दोन फेऱ्यांत प्रवेशपूर्व पात्रतापरीक्षा घेण्यात आली.

पहिल्या फेरीत एका खोलीत ग्राहकांच्या नित्याच्या असंख्य वस्तू ठेवल्या होत्या. तर दुसऱ्या खोलीत ग्राहकांना कोणतीही गरज नसलेल्या असंख्य वस्तू मांडल्या होत्या. विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य देण्यात आले की, कुठल्याही खोलीतल्या जास्तीत जास्त वस्तू त्यांनी समोरच्या मोठ्या बाजारात जाऊन दोन तासांत विकून याव्या व त्यांची नोंद परीक्षकांकडे करावी.

दुसरी फेरी ग्राहक-हाताळणी तंत्राची होती. जवळ कुठलीही वस्तू नसताना रस्त्यावर उभे राहून दहा मिनिटांत जास्तीत जास्त लोक गोळा करण्याची ती परीक्षा होती. दोन्ही फेऱ्यांचे गुण एकत्र करून त्या आधुनिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर झाली. दुसऱ्या खोलीतील वस्तू निवडणारे व दुसऱ्या फेरीत जास्तीत जास्त लोक गोळा करणारे सर्व गुणवत्ता यादीत आले होते.

दुसऱ्या खोलीतील प्रत्येक वस्तूला पहिल्या खोलीतील वस्तूंपेक्षा प्रत्येकी दसपट गुण होते. अभ्यासक्रमाचे नाव होते - 'मार्केटिंग मॅनेजमेंट : एडव्हान्स्ड ग्लोबल टेकनिक्स !'

***

तात्पर्य :

१. येरागबाळाचे काम नोहे ।

२.

४२. नवी नीती

एका घरात वडील इसापाच्या मानवी स्वभावावर प्रकाश टाकणाऱ्या उद्‌बोधक गोष्टींचे जुने पुस्तक वाचीत होते. त्यांचे दोन सज्ञान मुलगे जाताजाता ही गोष्ट ऐकत होते. ती एका गवाणीतल्या कुत्र्याची गोष्ट होती. बैलांसमोर घातलेल्या गवाणीतील कडब्यावर तो कुत्रा बसून भुंके. त्यामुळे बैलांनाही कडबा खाता येईना व कुत्रा कडबा खात नसल्याने तोही तो खाईना. गोष्ट संपली.

हे ऐकून मोठा मुलगा म्हणाला, 'खरे तर बैलांनी कुत्र्यावर अतिक्रमणाचा दावा लावायला हवा होता.' त्यावर धाकटा म्हणाला, 'पण दादा, कुत्र्यांनी वहिवाटीचा दावा करून तो आधी जिंकला असता.'

तो पुढे म्हणाला, 'मात्र बैलांना एक करता आले असते, कुत्र्याला गवाणीत कडबा टाकल्यावर तिथे न बसण्यासाठी त्यांनी काही देऊ केले असते, तर बैलांचा प्रश्न लवकर मिटला असता ! नाहीतर त्याच्यापेक्षा कमी पैशात त्यांना कुत्र्यावर सोडायला एखादा कोल्हाही मिळाला असता म्हणा !'

***

तात्पर्य :

१. संगणकाप्रमाणे बोधकथांच्या सुधारित आवृत्त्या (व्हर्शन्स) वारंवार काढणे, ही काळाची व माणसांची गरज आहे.

२.

४३. देवाची युक्ती

निर्मात्याने सृष्टीचे सारेच घटक निर्माण केले. अंधार-प्रकाश, सुख-दुःख, बरे-वाईट, जनन-संहार अशा अनेक गोष्टी सृष्टीत त्याने उत्पन्न केल्या. त्यातल्या माणसांना उत्कृष्ट जीव म्हणून अनेक आदर्श गोष्टी देऊन निर्माता देव मोकळा झाला. ती माणसे पोटाच्या-शरीराच्या गरजांसाठी भरपूर कष्ट करीत. पण ती 'गरजांपुरतेच काम' करीत असल्याने त्यांना मोकळा वेळही भरपूर राही. त्यात त्यांना आपल्या जन्मदात्या ईश्वराचे स्मरण उपजतच असल्याने या मोकळ्या वेळात ती माणसे देवळात व घरोघरी ईश्वराचे स्मरण करीत शांततेने जीवन घालवीत व मुक्त होऊन जात.

त्यामुळे चिंता, दुःख, निराशा, स्पर्धा, असूया - अशा अनेक भावभावनांना स्थानच न उरल्याने त्या सर्व निराश होऊन ईश्वराकडे गेल्या. त्यांनी काकुळतीने म्हटले,'देवा, माणसाच्या रचनेत काही तरी चुकले आहे. त्याच्या आत्ताच्या पद्धतीने तो जगला, तर पृथ्वीवरचा प्रत्येक जीव मुक्त होईल. येथे कोण राहाणार ? तुम्हाला पुन्हापुन्हा निर्मितीचे काम करावे लागेल. तेव्हा आमच्या निर्वाहाची काही सोय करावी व तुमचेही काम कमी व्हावे, असा काही उपाय काढावा.'

देव म्हणाला,'तुमचे बरोबर आहे. मी एक युक्ती करू शकतो. मी माणसाला दिलेले तर काढून घेऊ शकत नाही. मी त्याला आणखी एखाददोन गोष्टी जादा देऊन तुमची जगण्याची सोय करीन.' त्याप्रमाणे देवाने दोन गोष्टी केल्या. एक - माणसांना देवाच्या स्मरणाबरोबर 'देवाचे विस्मरणही' दिले आणि दोन - 'जे जवळ नाही त्यात समाधान आहे' असा भ्रमही दिला !

या दोन गोष्टी मनात उत्पन्न होताच माणसे पूर्वीप्रमाणे पुरेसे मिळूनही, 'जे जवळ नाही' त्यासाठी राबू लागली! त्यामुळे घरे, माणसे, वस्तू, परिस्थिती काहीही मिळाले,तरी काहीतरी सततच जवळ नसल्याने ती माणसे ते मिळवण्यासाठी जिवापाड कष्ट करू लागली! न मिळाले की, दुःखी, निराश होऊ लागली.

जवळ नसलेल्यात समाधान असल्याचा भ्रम झाल्याने त्यांना कष्टाला चोवीस तास पुरे पडेनात. त्यात इतरांशी स्पर्धा, त्यातून असूया, मत्सर सुरू झाले. इकडे देवाचे विस्मरण झाल्याने त्याने मिळणारी शांती, समाधान हरवले. सर्व नकारात्मक भावभावना मात्र सर्व जगभर आनंदाने जगू लागल्या. मुक्त होऊन जाणारी माणसे कमीकमी होऊ लागली !

***

तात्पर्य :

१. दुर्भावनांना जगात योग्य स्थान ठेवण्याची कदाचित ईश्वराची जबाबदारी असेल, पण आपली नाही !

२. ईश्वराने त्यांच्यासाठी केलेली युक्ती लक्षात घेऊन, आपण कौशल्याने राहिल्यास आपले जीवन पूर्ववत शांत, समाधानी करणे, ईश्वरस्मरणाला त्यामुळे वेळ मिळणे व आपण मुक्त होणे आपल्याच हातात आहे.

३.

४४. पुनर्वसन

लाखो वर्षांपूर्वी पृथ्वीवर प्रचंड जंगले होती. त्यात नाना प्रकारचे अहिंसक, हिंसक पशुपक्षी तसेच मानवही राहात. हजारो वर्षे लोटली. माणसांची प्रगती झाली. स्वत:वर नियंत्रण न राहिल्याने माणसांची संख्या व सुखाच्या अपेक्षा यांत अपरिमित वाढ झाली. दरम्यान काही बुद्धिमान लोकांनी अनेक चमत्कारिक व आश्चर्यकारक शोध लावले. निसर्गाला जिंकून मानवी जीवनाला 'अनैसर्गिक केले, अशांत केले.'

इकडे निसर्गक्रमाने जगणाऱ्या सामान्य निरुपद्रवी पशुपक्ष्यांचे जिणे मात्र कठीण झाले. हिंसक श्वापदे प्रमाणाने कमी झाली. पण ती स्वबळावर टिकून राहिली. काही माणसांना एकेकट्याला राहायलासुद्धा दहा-दहा,वीस-वीस खोल्या, महागड्या विश्रांतीगृहांसाठी हजारो खोल्या - असल्या अनेक गरजांमुळे माणसांना जंगलांची बेसुमार तोड 'करण्यापलीकडे मार्ग राहिला नाही'!

संख्येने रोडावत चाललेल्या सर्व पशुपक्ष्यांनी निसर्गाकडे धाव घेतली. पण त्याला मानवाने जिंकले असल्याने निसर्गाने त्यांची रवानगी माणसांकडे केली. माणसांच्या मायबाप सरकारने त्या पशुपक्ष्यांचे मनुष्यवस्तीत पुनर्वसन करण्याचे मान्य केले. त्यासाठी नव्या वैज्ञानिक तंत्रज्ञानाप्रमाणे त्यांचे माणसात रूपांतर करून हे पुनर्वसन व्हायचे होते. छोट्या, सरळमार्गी, दुबळ्या पशुपक्ष्यांनी त्यांतला धोका ओळखला. कारण माणसांतल्या सरळसज्जनांची आधीच ससेहोलपट होताना त्यांनी पाहिली होती. म्हणून निसर्गाला प्रार्थना करून, अजूनही निर्मनुष्य व निसर्गाच्या नियंत्रणात असलेल्या ध्रुवीय प्रतिकूल हवामानात स्थलांतरित होणे त्यांनी पत्करले.

हिंस्र पशुपक्ष्यांनी मात्र मनुष्यत्वात रूपांतर करून घेऊन पुनर्वसन आनंदाने मान्य केले. कारण अलीकडे माणसांत मिसळणे, त्यांच्यात त्यांना मित्र मिळणे सोपे होते, हे त्यांनी ओळखले ! मनुष्यात रूपांतर झाल्याने आता हे हिंस्रवृत्तीचे रूपांतरित लोक ओळखू येईनात. त्यांची संख्याही माणसांप्रमाणे अपरिमित वाढली. मनुष्यवस्तीत ही रूपांतरित माणसे कित्येक ठिकाणी आढळू लागली.

सामान्यांच्या कष्टांच्या मोजक्या कमाईचे महागाईच्या रूपाने ती माणसे लचके तोडीत, ज्या कामांसाठी पगार असे त्याच कामांसाठी गरजूंना नाडून वेगळे पैसे उकळीत, लोकांना व्यसनांच्या वस्तूंची चटक लावून पुढे त्या वस्तूंच्या तस्करीतून - विक्रीतून प्रचंड पैसा उकळीत, देश-धर्म-पंथ यांच्या नावाने दहशतीची व मनुष्यसंहाराची भीषण कृत्ये करीत, कधी बेभान नट-कलाकार-खेळाडू म्हणून आढळत, कधी पाताळयंत्री राजकारणी बनताना दिसत, कधी मानवी अवयवांचे भीषण व्यापार करीत, बिनगरजेच्या उपभोगांची सामान्यांना गळी पडून सवय लावणारे जाहिरातदार व त्यांचे मित्र भांडवलदार होत, दुर्दैवाने आजारी पडलेले गरजू रुग्ण कर्जबाजारी होईपर्यंत त्यांच्यावर महागड्या उपचारांचा कळवळा दाखवणारे आणि त्यांच्या जवळची पुंजी संपताच त्यांची उपेक्षा करणारे वैद्यकीय व्यावसायिक म्हणून वावरत, कधी भोळ्यागरजूंना नाडून इस्टेटी गोळा करणारे बुवा-महाराज होत, कधी मालमत्ता-पैसा-उपभोग यांसाठी माणसांना यमसदनाला पाठवणारे निर्घृण गुन्हेगार म्हणून वावरत!

अशा तऱ्हेने त्यांनी मुळात उत्तम असलेल्या अनेक पेशांना, कलांना, क्षेत्रांना शोषणाची अवकळा आणली. त्यांतलीच काही पैसा-उपभोगप्रिय असलेली रूपांतरित माणसे आता शासन - न्याय - सुरक्षा

अशा अनेक व्यवस्थांत शिरून बाहेरच्या या रूपांतरित हिंसक माणसांना 'आतून' साहाय्य करू लागली! त्यामुळे कष्टाळू, सामान्य, सरळमार्गी व शांततापि्रय माणसांना मात्र जिणे कठीण झाले. कायदेकानूंच्या मार्गातला वेळ-पैसा व या रूपांतरितांचा अडथळा यांमुळे सरळमार्गी लोक हतबल झाले.

शांततापि्रय, सरळ लोकांनी जागतिक मानवी मायबाप सरकारला अशा शांततापि्रय लोकांचे दुसरीकडे पुनर्वसन करून शांत-सरळ जीवन जगण्याची संधी देण्याचा विनंती-अर्ज दिला. त्यावर 'सहानुभूतीपूर्वक व तातडीने विचार करीत आहोत', असे 'सरकारी' उत्तर आले. त्याचबरोबर 'आपल्या अर्जावर सहा महिन्यांत हरकतअर्ज मागवले असल्याची' पुस्तीही जोडली होती.

सहा महिन्यांनी दुसरे उत्तरही आले. त्यात म्हटले होते,'आपण म्हणता त्याप्रमाणे, अन्यत्र पुनर्वसन करण्यास रूपांतरित तसेच आता माणसांच्यातल्याच झालेल्या अनेक मानवांच्या संघटनांनी हरकती दाखल केल्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, अशी सरळमार्गी माणसे दुसरीकडे गेल्यास, आम्हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. कारण त्यानंतर आम्ही नाडणार कुणाला, शोषण कुणाचे करणार याची कुठलीच 'पर्यायी तरतूद' या पुनर्वसन प्रस्तावात नाही. शिवाय कितीही नाडले, तरी या सामान्य माणसांना अनेकदा जिवंत सोडून त्यांना जगण्याची संधी आम्ही वेळोवेळी दिलेली आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. अल्पसंख्य सरळमार्गी लोकांच्या पिळवणुकीपेक्षा या रूपांतरितांच्या व तत्सम बहुसंख्य मानवांच्या जीवनाचा प्रश्न अधिक गंभीर असल्याने, ही हरकत विचाराधीन असल्याचे' सरळमार्गी लोकांना कळवण्यात आले.

प्रश्न प्रलंबित ठेवून सोडवण्याच्या एका 'प्रगत सरकारी तंत्रा'नुसार या अर्जाचा निकाल लागण्याची शक्यता या सरळमार्गी माणसांनी ओळखली. त्यांनी परमेश्वराला व निसर्गाला प्रार्थना केली व पुनर्वसनाची वाट न पाहाता दुर्गम, बर्फाळ, ध्रुवीय, निबिड अरण्यात स्वेच्छेने आणि गुप्ततेने स्थलांतर केले. तेथे फायदा नसल्याने हा भाग मानवाने जिंकला नव्हता व तो जिंकणेही माणसाला दुरपास्त होते!

तेथे पूर्वीच आलेल्या शाकाहारी, प्रेमळ पशुपक्ष्यांच्या सहवासात ही माणसे काकडत, असुविधांचे पण तणावरहित जीवन जगू लागली. निसर्गाच्या, देवाच्या प्रेमाची पाखर त्यांचे कष्टमय जीवन सुसह्य करीत होती !

इकडे बलिष्ठ शोषकांना दुबळ्या शोषकांचे शोषण करण्यापलीकडे मार्ग उरला नाही. स्वार्थाला कुणीच मागे हटेना आणि त्यातच त्या सर्वांची दुर्दैवी अखेर झाली.

सरळ, शुद्ध, शांत मानवांचे जीवन मात्र प्रतिकूल पण कृपाळू निसर्गात पशुपक्ष्यांच्या प्रेमळ सहवासात आकारत होते, दुसऱ्या युगासाठी!

१***

तात्पर्य :

१. शोषणाने अखेर शोषकच संपतो. सज्जनाला मात्र माणसातला व निसर्गातला ईश्वरच जगवतो.

२.

४५. दर्शन

जगाच्या अंगणात जमिनीच्या दुपट्यावर माणसाचे बाळ डोळे मिटून शांत झोपले होते. त्याच्या कानात देव पुटपुटला,'बाळा, मी तुला तीन डोळे दिले आहेत. त्या सर्वांचा वापर कर, आनंद घे.'

माणसाने प्रथम पापण्या उघडल्या. डोळे उघडले. त्याला असीम आकाश, सूर्य, झाडे, पाने, माणसे दिसली. तो इतका हरखून गेला की, त्याची नजर ठरेना. आता त्याला पाय फुटले. सारखे सारे पाहाण्यासाठी तो हिंडू लागला. त्याला पुन्हापुन्हा ते दर्शनाचे सुख हवेहवेसे वाटू लागले.

तो मोठा झाला. 'दिसे ते' पाहाण्याऐवजी 'त्याला हवे ते' पाहाण्यासाठी तो हिंडू लागला ! इतका की, त्याची साठी-सत्तरी आली तरी तो हिंडतच होता. जगाचा कुठला तरी कानाकोपरा, कुठला तरी किनारा-डोंगर-माणसे त्याची अजून पाहायचीच असत. तो माहितीसाठी पाही, पहिल्यांदा म्हणून पाही, आवडले म्हणून पुन्हापुन्हा पाही, इतरांनी पाहिले म्हणून पाही. डोळ्यांची व दर्शनाची तहान संपेना ! माणूस म्हणून सत्तरी आली, तरी त्याची अवस्था बाळासारखीच होती !

दुसरे त्याने असे पाहिले की, कुणी त्याला काळा म्हणे-कुणी सावळा-कुणी गोरा, कुणी सामान्य म्हणे-कुणी छान-कुणी देखणा. त्या त्या वेळी त्याला सुखदुःख होई. आपण नक्की कसे, ते त्याला कळेना.

एकदा असाच पर्यटन करीत असताना एका स्वच्छ सरोवराकाठी तो उभा होता. तो सहज सरोवरात डोकावला. त्यात त्याचे रूप त्याला दिसले. तो खरा कसा आहे ते त्याला थोडे कळले. त्याला बाळपणची

आठवण झाली. देवाने दिलेला दुसरा डोळा आता उघडला होता.

अचानक त्याला आरसाही सापडला. त्यात तर त्याला स्वतःचे खरे दर्शन आता होऊ लागले. त्याला नावे ठेवणाऱ्यांचा त्याला क्षणभर राग आला. पण खरे बोलणाऱ्यांचे ऋणही त्याला आता कळले.

प्रथमच त्याने आपले रूप बदलण्यासाठी मेकअप्सारखे अनेक कृत्रिम उपायही शोधले. लोकांकडून मिळणारी तात्पुरती स्तुती त्याला आवडू लागली. तरीही त्यासाठी त्याचे वेगवेगळे प्रयत्न सुरू राहिले.

हळूहळू या धडपडीच्या मर्यादा त्याच्या लक्षात आल्या. जरी तो साठीचा, सत्तरीचा झाला, तरी त्याचे चांगले 'दिसण्याचे' प्रयत्न सुरू राहिले. दुसऱ्या रूपदर्शनाने एकीकडे तात्कालिक सुख तर आतून कायमची अस्वस्थता राहू लागली. त्या अर्थाने तो अपरिपक्व बाळच राहिला !

पुढे त्याच्या लक्षात आले की, लोक त्याला चांगला-वाईट-स्वार्थी-मतलबी-उदार-कंजूष असेही बरेच काही म्हणत. त्याने तो कधी सुखावे, तर कधी दुखावे. स्तुतीने संबंध जुळत, तर निंदेने बिघडत. त्याला ते ऐकून मात्र आतून अस्वस्थता व अशांती राही. लौकिकदृष्ट्या तर घरदार, पैसापाणी त्याला काही कमी नव्हते.

तो एक दिवस आरशासमोर उभा असताना त्याला बालपणचे देवाचे उद्‌गार आठवले. त्याच्या मनात चमकून गेले. दोन डोळे नि दोन दर्शनांचा तर आपण अनुभव घेतला, कदाचित आत पाहू शकणारा तिसरा डोळा तर देवाने दिला नसेल ना ?

त्याक्षणी त्याने आत शोधायला सुरुवात केली. आपले संस्कार, मते, पूर्वग्रह, असंख्य अनुभव, रागलोभ, तीव्र असूया - अशा महाविश्वाचे त्याला क्षणार्धात दर्शन झाले, हे त्याच्या लक्षात आले !

आपल्याला लोक काहीही म्हणोत, जसे आपण कुणी खरे काळेगोरे होतो, तसेच आतही आपण चांगलेवाईट जसे आहोत तसेच खरे आहोत. म्हणून त्याने ही मते, अनुभव यांचे आतले ढीग उपसायला सुरुवात केली. काही थरांत सुगंध तर बऱ्याच थरांत दुर्गंधी येत होती. आपल्याच आग्रहांची-मीपणांची-अहंकाराची दुर्गंधी देणारे ते थर उपसून फेकून देताना त्याला आपल्याच मनाचा प्रचंड विरोध सहन करावा लागला.

पण त्याच्या एक लक्षात आले की, माझेमाझे म्हणून आग्रहाने जपलेले जसजसे तो उपसून फेकून देत आहे, तसतसे त्याचे अंतर्याम हलके होत आहे. सुखदुःखापलीकडली शांती-आनंद अनुभवायला येत आहे.

जितकी आत स्वच्छता होऊ लागली, तितका हा खरा आनंद वाढू लागला. झऱ्यावरचा कुजलेला पालापाचोळा दूर केल्यावर एकीकडे दुर्गंधी जावी आणि दुसरीकडे निर्मळ झरा मोकळा होऊन स्वच्छ, जिवंत पाणी दिसावे, तशी त्याची अवस्था झाली.

सर्व पुटे बाजूला झाली तेव्हा त्याचा तिसरा डोळा - अंतश्चक्षू उघडला ! तुला तीन डोळे दिले आहेत, असे बाळपणी म्हणणारा 'मनोहर, आत्मरूप ईश्वर' प्रसन्नपणे विराजमान झालेला त्याला त्या तिसऱ्या डोळ्याने दिसला !

जगात कुठेही न हिंडता मिळणारा, कशावरही अवलंबून नसलेला, कधीही न अंतरणारा आत्मानंद त्याला गवसला होता. तिसऱ्या डोळ्याने त्याला स्वस्वरूपदर्शन घडवले होते. आता ते बाळ राहिले नव्हते, तो पूर्ण, प्रगल्भ, आनंदी मानव झाला होता !

***

तात्पर्य :

१. विश्वदर्शनातल्या दृष्टिसुखात अडकल्याने
स्वरूपदर्शन हुकते, तर स्वरूपदर्शनात अप्रामाणिक
व बेसावध राहिल्याने खरे आनंदाचे स्वस्वरूपदर्शन
शक्य असूनही लांबते - कदाचित अनेक जन्मही !

२.

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने


७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

दर्शन



सद्यःस्थितीचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या व
शाश्वताचे दिग्दर्शन करणाऱ्या
नव्या प्रतिभाशाली बोधकथा